# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९३६/२००७.

सौ. प्रतिभा बबनराव समर्थ ,
दुध डेअरी ब्रिज, जुने रिमांड होम समोर,
रयतवारी मार्ग, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. चिलमुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
आयुक्त /प्रादेशिक संचालक,
नगर परिषद प्रशासन,
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.

श्री. किशोर गांधी,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १६.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) माझ्या दिनांक ११.७.२००२ व दिनांक २२.७.२००६ च्या आपणास प्रेषित केलेल्या पत्रांची पावती मजकडे आहे. ती पत्रे नगरपरिषद कार्यालयात असतीलच पण कोणतीच कारवाई न झाल्याने मी फार अडचणीत आले आहे. त्याचे प्रारुप (अ)

... २

अष्टविनायक सोसायटीच्या बांधकामाच्या कांही भाग आमच्या घराचे हद्दीत आलेला आहे. त्यांचे पुढील बांधकामांत आमचे घराचे न्हाणीघर तोडल्या जाण्याची शक्यता आहे. तरी नागरी मुलभूत सुविधा संरक्षण, हवा, पाणी, सांडपाण्याची विल्हेवाट आदि बाबी गृहीत धरुन निर्धारित अंतराने ते सोयीस्कर बांधकाम उपरोक्त सोसायटीने केल्यास आम्हास त्रास होणार नाही. म्हणून आपल्या प्रतिनिधीच्या मध्यस्तीने हे शांततामय व आवश्यक कारवाही करुन आमचे मुलभूत नागरी संरक्षण करावे ही विनंती. (ब) जुन्या घराच्या पावसाळी दुरुस्तीची अनुमती मागितली होती. २) नगर परिषदेत माझ्या घर खरेदी दस्तावेज १९९३ च्या सुपूर्दीप्रमाणे मला नगर परिषद घर क्रमांक ७०४ इंडस्ट्रियल वार्ड मिळाला आहे. ३) सचिव, ग्राहक संरक्षण केंद्र, चंद्रपूर हयांना पाठविल्या दिनांक १३.२.२००६ च्या पत्रातील अंश अष्टविनायक हौसिंग सोसायटी, चंद्रपूरच्या उद्घाटन वेळी आमदार द्वयांनी बजावले की, मोहल्ल्यातील लोकांना त्रास होऊ नये पण हयांच्या इमारती आमच्या हद्दीत आलेल्या आहेत. आता गेट तयार करुन राहिले. आम्ही १५ वर्ष आधीचे रहिवासी असल्याने आमच्या घरा समोरुनच आम्हास रस्ता करुन द्यावा. आम्ही स्वतंत्र तेंव्हा सोसायटीशी काही संबंध कांप्रोमाईज नाही. ४) माझ्या दिनांक १०.४.२००६ च्या जिल्हा तक्रार निवारण मंच, चंद्रपूर हयांना प्रेषित पत्राचे अंश विविध विभागांना अशी १० पत्रे व त्यातून विनंती निरीक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर हयांच्या पत्र क्रमांक ६०२/२००५, दिनांक २.३.२००५ हया सरकारी पत्राप्रमाणे सोसायटीची सारी कामे व्हावयास हवी आम्ही आधीपासूनचे ब्रिटीश कालीन घरांत वास्तव्याने रहिवासी असून आमच्या घरासमोरच पर्याप्त रस्ता पाहिजे. कारण आमचे कुठेही कांप्रोमाईज नाही. ५) (अ) माझ्या दिनांक ६.७.२००६ च्या तहसीलदार, चंद्रपूर हयांना पाठविलेल्या पत्राचे अंश लगतच्या अष्टविनायक सोसायटीचे बांधकाम आमचे हद्दीत आलेले दिसल्याने मी दिनांक १६.७.२००२ ला मा.कलेक्टर, चंद्रपूर (म.स.नि.से.) हयांना स्वतः अर्ज दिला एक तहसीलदार साहेब आमच्या हया एरियात आले असतांना तो अर्ज त्यांना दाखविला पण आमची समस्या सोडविली नाही. आमचे घर खालानांत आल्याने उपरोक्त सोसायटीचे पाणी आमच्या घराच्या आजूबाजूने जमा होते. हे ४-५ वर्षापासून आहे. दिनांक ३.७.२००६ च्या पर्जन्यवृष्टीस नगरसेविका सौ. लक्ष्मीबाई सावरकर हयांनी स्वतः येऊन हे चित्र बघितले. तेंव्हा सुरक्षित उपाय आवश्यक आहेत. (ब) जसे श्री. अभिजित सेन हयांच्या साईडने कामे केलीत त्याच सरळ रेषेने श्री.चिंतामणी राऊत हयांच्या साईडची सरळ रेषेत जागा न सोडता कामे घेतली असती तर आमचे हद्दीत सोसायटी बांधकामाचे अतिक्रमण झाले नसते व आमदारांचे वचन पण पाळल्या गेले असते. (क) आमची

... ३

जागा सोडून त्या बाजूचे कंपाऊंड तर त्या सोसायटीने बांधलेच नाही. जे प्रथम दर्शनी करायला पाहिजे होते. पण त्यांच्या सपोर्टने यशवंत गुंडावार त्यांची जागा नसून देखील ताटवा कंपाऊंड बांधून सोसायटीचा बगीचा तयार केला. आता सोसायटीला अन्य बगीचा नको. कारण हया सोसायटीने आणखी एकाच दिशेने दोन वेळा कंपाऊंड बांधून (त्यातील एक आता तोडले) आम्हास आमचा सलग रस्ता सोडला नाही व आम्हास कोंढी केली हे आमच्यावर झालेले अन्याय म्हणजे मानवाधिकाराचे हनन होय. (ड) माझे स्वतंत्र खरेदी खत असतांना ही सोसायटी कोणत्या अधिकाराने पत्र पाठविले की, आम्ही त्यांच्या जागेत राहतो. मात्र आमचा पत्र व्यवहार सोसायटी स्विकारत नाही. (सोसायटी पत्र क्रमांक ५०/अष्ट/२००५/गोपनीय दिनांक ३०.५.२००५) (इ) सोसायटी आम्हास पावसाळी घर दुरुस्ती करु देत नाही. आम्ही अनप्रोटिवटेड आहोत. तेंव्हा निवाडा होईस्तो त्यांना पण कोणतेही काम करु देऊ नये. (फ) ही सोसायटी २ वेळा एकाच दिशेने वाल कंपाऊंड करणारी व नंतर एक तोडणारी त्याच खर्चात आमच्या घराच्या बाजूने सोसायटीच्या पक्क्या भिंतीच्या रेषेने वाल कंपाऊंड टाकू शकली असती. पण तसे न करता बुध्दिपुरस्सर आम्हास त्रास निर्माण करत आहे व अध्यक्ष शेजारीच्या भाडेकरुंना चिथावून आमच्याशी भांडणे करायला लावित आहे. सोसायटीचे प्रस्तावित कंपाऊंड झाले तर वसाहतीतील रहिवाश्यांशी आमचा वाद-विवाद व्हायचा प्रश्नच उद्‌भवणार नाही व आमदार द्वयांची इच्छापूर्ती पण होईल. (ग) वरील सोसायटीची अतांत्रिक कामे करणारे व्यवस्थापकीय तथा प्रशासकीय उभयपक्षी नांवे व पदवी करवाव्यात. ६) वरील विषय मी दिनांक ७.६.२००६, दिनांक २५.९.२००६ व दिनांक ३०.१०.२००६ रोजी मा. कलेक्टर, चंद्रपूर तथा आयुक्त तथा प्रा. संचालक, न.प.प्र., नागपूर हयांचेशी पत्राने घेतलेले आहे. (आयुक्तास दिनांक २५.९.२००६ च्या अर्जाद्वारे) ७) तेंव्हा विनंती ही की, माहिती अधिकार व त्यानुसार कार्य अन्वयन माझे मागील अर्ज व प्रस्तुत अर्जातील परिच्छेद १ ते ५ (अ) ते (ग) तसेच ६ प्रमाणे करावे. ८) अपील व पेटीशन अधिकाऱ्यांना पाठविण्यासाठी परिच्छेद क्रमांक ८ मधील A to Z सर्व कागदपत्रे, रिकार्ड व नकाशाप्रती मज उपलब्ध करुन द्याव्यात. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.११.२००६ रोजी सहाय्यक माहिती अधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांनी उपरोक्त संदर्भीय अर्जाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शासनाचे अभिलेखात कोणतेही अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाणे (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामग्री

इत्यादी माहिती प्रतीच्या स्वरुपात पुरविण्याची तरतुद आहे. आपले अर्जामध्ये वरील माहिती पैकी काय अपेक्षित आहे याचा स्पष्ट अर्थबोध होत नाही. तरी आपण प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित झाल्यास संबंधित विषयाची नस्ती आपणास अवलोकनार्थ पुरविणेत येईल. त्यानंतर अपेक्षित असलेली माहिती पुरविणेत येईल. नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने अपीलकर्ती हिचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३१.१.२००७ रोजी आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये माहितीचा विषय जमीन खरेदी व घरबांधणी असे दिलेले दिसून येतो. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक १७.२.२००७ रोजी उपआयुक्त (सा.प्र.) तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, चंद्रपूर यांना सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १.३.२००७ ला सकाळी ११:०० वाजता सुनावणीस उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद, चंद्रपूर यांनी आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, नागपूर यांना दिनांक २८.२.२००७ रोजी अपीलकर्ती यांचा दिनांक १६.११.२००६ रोजीचा अर्ज मोघम स्वरुपाचा असून कार्यवाही संबंधात आहे. तरीसुध्दा अर्जदारास दिनांक ३०.११.२००६ चे कार्यालयीन पत्राने आपण प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित झाल्यास संबंधित विषयाची नस्ती अवलोकनार्थ पुरविण्यात येईल असे कळविले. परंतु अर्जदार कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. तरी सदरील अपील खारीज करण्यात यावे असे कळविले दिसून येते. दिनांक १४.३.२००७ रोजी सदरचा अर्ज हा मुख्याधिकारी, नगरपरिषद, चंद्रपूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला असे दिसून येते व त्यामुळेही अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ती यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर, मुख्याधिकारी, नगरपरिषद, चंद्रपूर, दुय्यम निबंधक, चंद्रपूर, वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, चंद्रपूर राजस्व अधिक्षक, चंद्रपूर, अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, चंद्रपूर व पुन्हा चिफ ऑफीसर, नगर परिषद, चंद्रपूर यांना दिलेली अनेक अर्जाचा उल्लेख केलेला दिसून येतो. अपीलकर्ती यांच्या सदरच्या अर्जाचेवरुन तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांच्याकडे केलेला दिनांक १७.११.२००७ च्या अर्जावरुन मागितलेल्या माहितीचे बद्यल जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की,

अपीलकर्ती हया अश्याच प्रकारे भरपूर वर्णन असलेले अर्ज करीत असतात व त्यावरुन त्यांना काय बाब आहे याबद्दलचा अर्थबोध होत नाही. त्यांचा दिनांक ११.७.२००२ व दिनांक २२.७.२००७ च्या अर्जामध्ये सुध्दा अशाच प्रकारची मागणी केलेली दिसून येते व त्याकरिताच त्यांनी प्रत्यक्ष येऊन त्यांचा प्रश्न सोडविता येईल असे कळविले होते. परंतु त्या प्रत्यक्ष हजर होत नसल्यामुळे त्यांच्या प्रश्नाबद्दल कोणत्याही प्रकारची सोडवणूक करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध असलेल्या माहितीची छायांकिंत प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी कळविले आहे. परंतु त्यांच्या अर्जामध्ये तशा प्रकारची मागणी दिसून येत नाही व ही बाब राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील मेमोवरुन सुध्दा दिसून येते. अपील मेमोमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे ज्या अर्जाचा उल्लेख केला आहे व त्यांची छायांकिंत प्रत अपील मेमो सोबत जोडली आहे. त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याचे आदेश देण्याचा अधिकार राज्य माहिती आयोगास नाही व अशा प्रकारे अनेक कार्यालयातील अनेक अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जातील संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा द्वितीय अपील दाखल करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे माहिती मागण्यासाठी जो अर्ज केला असेल त्याच अर्जाचे संदर्भामध्ये प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करता येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगास सुध्दा त्यांच्या अपील मेमोमध्ये उल्लेख केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची दखल घेता येत नाही. मात्र त्यांचा दिनांक १७.११.२००७ च्या अर्जात दिनांक ११.७.२००२ व दिनांक २२.७.२००६ चा तक्रार अर्जाचे संदर्भात कार्यवाही काय झाली असे त्यांना अपेक्षित दिसते व त्या अर्जाचे संदर्भात नगरपरिषद कार्यालयात जी कार्यवाही झाली असेल त्या कार्यवाहीचे संदर्भात असलेल्या टिप्पणी किंवा निर्णयाची छायांकिंत प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांचा दिनांक १७.११.२००७ च्या अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दिनांक ११.७.२००२ व दिनांक २२.७.२००६ या अर्जाचे संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती यांच्या दिनांक १७.११.२००७ च्या अर्जामध्ये ज्या तक्रारीच्या स्वरुपामध्ये माहितीचे वर्णन केलेले आहे त्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन त्यांचे प्रश्न सोडवणूक करुन घ्यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६१७-६२२/१.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९४०/२००७.

श्री. शंकर किसन बंगळे,
मु. विठोली (मा.), पो. विठाळा,
ता. दिग्रस, जि. यवतमाळ. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
यवतमाळ.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
दिग्रस, जि. यवतमाळ. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी कार्यालयास प्राप्त राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. अपीलकर्ता यांचे वतीने श्री. ए. आर. अभ्यंकर, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. एस. पी. मेत्रेकर, सहाय्यक निबंधक प्रशासन हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे विना अनुमतीने गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००६ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक ६.१२.२००६) शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांच्याकडे आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. सनिरी/नियमन/तक्रार/२८५१/०६, हया पत्रात उल्लेख केलेल्या नुसार संस्थेच्या सचिवाने सादर केलेल्या रेकॉर्ड व लेखी बयानाची प्रमाणित प्रत मिळावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.

... २

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१२.२००६ रोजी संस्थेचे माहिती अधिकारी संस्थेचे सचिव असल्यामुळे आपण अर्जातील माहितीसाठी संस्थेच्या सचिवांशी संपर्क साधावा. सबब आपला अर्ज हया कार्यालयाचे स्तरावर नस्तीबध्द करण्यात येत आहे. प्रत माहितीकरिता सस्नेह रवाना सचिव, ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., विठोली (मा.) सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.३.२००७ रोजी देण्यात आलेला असून शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपीलार्थी यांनी मागणी केलेली विहित माहिती त्यांना सत्य स्वरुपात व विहित कालावधीत विहित रित्या पूरवावी आणि पुरविण्यात येणारी माहिती असत्य तथा अर्धवट राहणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १४.६.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली परंतु त्यामध्ये दिनांक ३१.१०.२००६ चे सचिव, ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. विठोली (मा.) यांच्या बयाणाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याच माहितीच्या अर्जामध्ये सचिवांनी सादर केलेल्या रेकॉर्डची माहिती मागितली होती. ती माहिती मात्र उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

३. अपीलाचे सुनावणीच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी कोणताही खुलासा दाखल केलेला नाही. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी हे आयोगाने दिनांक २९.७.२००८ रोजी दिनांक १.९.२००८ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता नोटीस काढून सुध्दा उपस्थित राहिले नसल्याने त्यांनी आयोगाचा निश्चितच अवमान केलेला आहे. याबाबत त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे संयुक्तिक राहील.

४. अपीलकर्ता यांनी त्यांच्या तोंडी युक्तिवादामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे अपूर्ण, खोटी, दिशाभूल करणारी माहितीच्या संदर्भामध्ये जरी सांगितले असले तरी त्याबाबतचा लेखी खुलासा दाखल केलेला नाही.

... ३

तरी सुध्दा संस्थेच्या सचिवांनी सादर केलेला रेकॉर्डची माहिती ही त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली असल्यामुळे व ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.११.२००६ (५/६.१२.२००६) च्या अर्जाप्रमाणे विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.दिग्रस यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.दिग्रस हे आयोगाचे पुढे अपीलाचे सुनावणीस हजर राहिले नसल्यामुळे व कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी सादर केलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ यांनी प्रशासकीय कार्यवाही करुन त्यांना समज देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६२३-६२५/१.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७५३/२००७.**

श्री. सुधाकर तिडके,
१८, अर्थ बंगलो, नेहरु नगर,
खामला रोड, नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अधिक्षक, भूमी अभिलेख,
नागपूर.

श्री. शिवदास गुंड,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्रमांक - ३,
६ वा माळा, प्रशासकीय भवन,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता दिनांक १७.६.२००७ रोजी व दिनांक १४.७.२००८ रोजी हजर होते. परंतु आज गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एन. एस. पराते, वरिष्ठ लिपिक हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांचेकडे अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक भू-३/सि.टी.एस. आर. ५३१/०६, दिनांक २८.८.२००६ आणि नगर भूमापन क्रमांक-३ यांचे आदेश क्र.प.भू.२९/अपील/मौजा लेंड्रा न.भू.क्र. १८८/०६, दिनांक २८.८.२००३ अन्वये कार्यालयाचा फे. क्र. ८०५, दिनांक ६.१.२००३

... २

अन्वयेची नोंद रद्य करुन गाळा क्रमांक ९ व ११ वर महाराष्ट्र शासनाचे अधिसुचना दिनांक २८.१०.२००६ अन्वये जप्तीची नोंद दर्ज आदेश प्रकरणात पारित करणेकरिता विचारात घेतलेल्या संपूर्ण कागदपत्रांची कार्यालयीन टिपणीसह प्रमाणित प्रत देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १३.३.२००७ रोजी आपणास पाहिजे असलेल्या कागदपत्राचे प्रतिसाठी प्रतिपान रुपये १५/- चा भरणा करुन आपणास त्यांच्या प्रती कार्यालयीन वेळेत (११:०० ते २:००) प्राप्त करुन घेता येतील असे नगर भूमापन अधिकारी क्र.३, नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००७ रोजी नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांना माझे माहितीनुसार केंद्रीय माहितीचा अधिकार, २००५ मधील मार्गदर्शक तत्वानुसार प्रतिपान प्रतीसाठी रुपये २/- भरणा करणे आवश्यक आहे ते भरणेस मी तयार आहे. कृपया सुधारित पत्र निर्गमित करावे किंवा रुपये १५/- चा भरणा करण्याबाबतचे शासकीय आदेशाचा पुरावा द्यावा अशी विचारणा केलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ११.४.२००७ रोजी नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना भूमि अभिलेख विभागाकडील कागदपत्रे व अभिलेख यांचे नक्कल फी संदर्भात आकारावयाचे दर महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २५.९.२००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत व राजपत्रात प्रसिध्द झालेले नक्कल फीचे दर आपणास कार्यालयाचे पत्र क्र. सम दिनांक १३.३.२००७ अन्वये कळविण्यात आले आहेत. आपणास सदर राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसुचना पाहावयाची असल्यास ती कार्यालयीन वेळेत पाहाता येईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून मौजा लेंड्रा येथील महाराष्ट्र शासन जप्तीची नोंदीची नक्कल फी शासनाचे परिपत्रक CTS at ४(१) A नुसार फी रुपये २४७५/- भरणा करुन माहिती देण्यास नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर हे तयार आहेत व ही बाब सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसुचना क्रमांक RTI-२००५/CR.२१५/०५/०५ च्या तरतुदीशी सुसंगत आहे. तेंव्हा अपीलार्थी यांनी त्यांचेकडे विहित फी च्या भरणा करुन नक्कल प्राप्त करुन घ्याव्यात. सदरचे अर्जावर आता कोणतीही कार्यवाही करणेवर शिल्लक नसलेने अर्जदार यांचा दिनांक ५.५.२००७ चा अपील अर्ज निकाली ठेवण्यांत आलेला आहे. असा निर्णय देण्यात आला असून सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांनी व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ हा दिनांक १२.१०.२००५ रोजी अंमलात आलेला आहे. सदरच्या नियमाप्रमाणे नियम क्रमांक ४ मध्ये खालील प्रमाणे तदतुद आहे. Fee for information. १) For providing the information under sub-section (१) of section ७ the fee shall be charged by way of cash against proper receipt or by demand draft or bankers cheque payable or by way of money order to the public suthority. At the following rates, namely :

| | |
|---|---|
| A) (a) When the concerned Department has already fixed the price of some documents, Maps, etc. | The price so fixed plus postal charges. |
| (b) When the information is readily available either by way of photocopying, or by other Way (copy) | i) rupees two for each page (in A-४ or A-३ size paper) created or copied plus postal charges; or ii) actual charge or cost price of a copy in large size paper plus postal charges. |

वरील नियमाप्रमाणे विभागाने पूर्वीच कागदपत्रे किंवा नकाशे उपलब्ध करुन देण्याकरिता जर फी ठरविली असेल तर अशा प्रकारची फी पोस्टल चार्जेस आकारण्यात यावा. याचा अर्थ प्रमाणित प्रत तयार करुन देतांना त्यातील शब्द आणि शब्द तयार करुन देऊन प्रमाणित करुन देणे अपेक्षित आहे. अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडून स्थावर मालमत्तेच्या संदर्भामध्ये हक्कपत्रकांच्या आखीव पत्रिका किंवा मिळकत पत्रिका उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर त्याकरिता अर्थातच त्याबाबत जबाबदारीने उपलब्ध करुन द्यावी लागतात व त्यामुळे अशा प्रकारची आखीव पत्रिका किंवा मिळकत पत्रिका प्रमाणित प्रती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्यापूर्वीच्या नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देणे अपेक्षित दिसते. परंतु जी माहिती टिप्पणी किंवा नस्तीचे तयार स्वरुपात उपलब्ध आहे त्या कागदपत्रांची छायांकित प्रती हया रुपये २/- प्रती प्रमाणे तसेच टपाल हसीलाप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी असे वर नियम (बी) प्रमाणे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी संबंधीत

जप्तीच्या नोंदीच्या संदर्भामध्ये ज्या अर्ज किंवा टिप्पणीचा आधारावर निर्णय झाला आहे त्यावर संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती मागितलेल्या दिसून येते असल्यामुळे सदरच्या कागदपत्राची छायाकिंत प्रती हया रुपये २/- प्रती प्रमाणे व माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिली व कार्यालयाचा रबर स्टॅम्प देऊन प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहील. स्वाक्षरीची आवश्यकता असणार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २३.२.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीचे संपूर्ण कागदपत्रांची टिप्पणीसह प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिली व कार्यालयाचा रबर स्टॅम्प देऊन प्रमाणित करुन द्यावी. उपलब्ध करुन घेण्यास अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आतं पृष्ठ संख्या व त्याकरिता प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे व येणारा खर्च व टपाल खर्च कळविण्यात यावा.

२) अपीलकर्ता यांना माहितीच्याकरिता कळविण्यात आलेले शुल्क व अधिक टपाल खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे माहिती छायांकिंत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६२६-६२९/२.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९४५/२००७.**

डॉ. उत्तमराव आत्मारामजी तिखीले,
मु. पो. पथ्रोड, ता. अचलपूर,
जि. अमरावती - ४४४ ८०८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

डॉ. दिलीप नामदेवराव निकोसे,
जनमाहिती अधिकारी तथा
अति. जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी विना अनुमती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे डॉ. आर. अे. भुस्कुटे, यांच्या निवृत्ती व सेवेबद्यल सर्व माहिती मागितलेली दिसून येते. तसेच स्वतःची सेवा जेष्ठता, वेतन श्रेणी दुरुस्ती करुन माहिती मागितलेली आहे व डॉ. आर.अे. भुस्कुटेचे संदर्भामध्ये तुलना करुन सुधारित वेतनश्रेणी मिळावी याकरिता माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.४.२००७ रोजी उपरोक्त पत्राचे अनुषंगाने आपण मागविलेली माहिती ही महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २२.१२.२००५ पान नं. ९ परिच्छेद ८(ख) नुसार

...२

फेटाळण्यात येत आहे. असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीच अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी ज्यावेळेस म्हणजे दिनांक ४.४.२००७ रोजी माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता त्याच वेळेस त्यांचे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्याकडे केस प्रलंबित असल्यामुळे जिल्हा स्वास्थ अधिकारी यांनी दिनांक २५.४.२००७ रोजी अधिनियमाचे कलम ८(१)(ख) च्या आधार घेऊन माहिती फेटालेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व आजही जनमाहिती अधिकारी हजर नाहीत व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे अतिशय बेजबाबदार आहेत असे दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक २५.४.२००७ रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्याबाबत न्यायालयाने एखादी माहिती उपलब्ध करुन देण्यास मनाई करण्यात आलेली आहे असे आदेश दिलेले असल्यासच ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु अशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत असे दिनांक २५.४.२००७ च्या उत्तरामध्ये दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ४.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कारणमिमांसा देणारा निर्णय द्यावयास पाहिजे होते व त्याहीबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याती प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. असे असल्यामुळे दिनांक ४.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे कागदपत्रांचे स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकिंत प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.४.२००७ च्या अर्जामधील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील मेमोमधील वेतनश्रेणी व निवृत्ती वेतन विनियमीत करुन थकीत रक्कम मला मिळावी ही विनंती मात्र मान्य करता येत नाही.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६३०-६३२/४.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९५१/२००७.

श्री. सिध्दार्थ, नत्थुजी शहारे,
मु. चप्राड, पो. सोनी,
ता. लाखांदूर,
जि. भंडारा - ४४१ ८०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. डी. बागडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लाखांदूर,
जिल्हा भंडारा.

श्री. आर. एन. ढवळे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, चप्राड,
ता. लाखांदूर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, चप्राड यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) वरील पदासाठी किती अर्ज दाखल केले होते ? २) वरील पदासाठी नेमणूक ग्रामसभेत झाली काय ? ३) ग्राम सभा घेण्यात आली काय ? त्यांचे स्थळ व दिनांक द्यावा. ४) ग्रामसभेत आलेले अर्जाचे वाचन करण्यात आले काय ?

... २

५) ग्रामसभेत पदाच्या नियुक्ती बाबत चर्चा करण्यात आली काय ? ६) ग्रामसभेत ठराव वरिष्ठांस सादर केले काय ? ७) ग्रामसभेत किती लोक हजर होते ? ८) माझे अर्जाबाबत काय ठरविण्यात आले व त्याची माहिती मला का देण्यांत आली नाही ? ९) माझी नेमणूक कां डावलण्यात आली. १०) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सेवक कोणत्या प्रकारे निवड करण्यात आली. ११) अर्जदाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, गुणपत्रिका व अनुभवाचे दाखले जोडले होते काय. वरील माहिती मला पुरवावी हीच विनंती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून दिनांक २७.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहे अशी नोंद दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणीसाठी दिनांक २४.४.२००७ रोजी पत्र दिलेले असून सुनावणी दिनांक २७.४.२००७ रोजी ठेवण्यात आलेली दिसून येते. सुनावणीच्या मध्ये माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती सचिवांनी ११ मुद्यावरील संपूर्ण माहिती दिली. सदर माहिती अपूर्ण असून माहितीचे झेरॉक्स पाहिजे म्हणून दुसऱ्यांदा सचिवाकडे अर्ज करावे म्हणून दोन्ही मुद्यांवर चर्चा झाल्यानंतर सहमती दर्शविली. माहितीच्या अधिकाऱ्यांमार्फत केलेल्या अर्जाची माहिती अपूरी दर्शविल्यामुळे मजसमाधान नाही. मला सर्व मुद्यांच्या झेरॉक्स प्रती पाहिजेत असे अपीलकर्ता यांनी नोट शिटवर आक्षेप नोंदविलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी मात्र दुसऱ्यांदा सचिवांकडे अर्ज करावा असे नमुद असल्यामुळे त्यांना छायांकित प्रतीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले असून त्यात ११ मुद्यांच्या संदर्भात छायांकित प्रतीची मागणी केलेली दिसून येते व दिनांक २०.३.२००७ ला माहिती न देता दिनांक २६.४.२००७ ला माहिती दिली त्याचा कारणाची झेरॉक्स प्रत अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अपूरी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली. अपूरी व दिशाभूल करणारी माहिती ही सिध्द करावी लागते. त्याकरिता त्यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २६ जानेवारी २००७ रोजी जी ग्रामसभा दाखविण्यात आली आहे ती सभा झाली नाही असे त्यांचे

म्हणणे आहे व त्यामुळे ग्रामीण रोजगार हमी योजना सेंवकांची नियुक्ती करण्याबाबत व जे निर्णय झाले आहे ते ग्राम सभेत झाले नाही असे त्यांचे म्हणण् आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या ग्राम सभेची जाहीर सूचना दिनांक २६.१.२००७ व कामकाजाचा विषय नोटीसची मुळ छायांकित प्रत अशी दिसून येते व ग्रामसभा बोलविण्यात आली होती तसेच ग्राम सभेत उपस्थित आलेल्या १०५ ग्रामस्थांच्या सहया असलेली नोंदवही ही आयोगाचे निदर्शनास आणली व त्या नोंदवहीवर सरपंच त्यांच्या सहया आहेत व त्यामुळे सदरची सभा झाली नाही असा निष्कर्ष काढण्यात येत नाही. त्यातही सेवकाची नियुक्ती कां झाली नाही हा त्यांचा दुसरा मुद्या उपस्थित केलेला आहे. त्याबाबतही जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अर्ज आलेल्या दोन उमेदवारांच्या संबंधामध्ये त्याचा अर्ज व सोबत जोडलेले अर्हतेची कागदपत्रे आयोगाचे निदर्शनास आणली त्यात अपीलकर्ता यांचा अनुभव हा कमी आहे व त्यामुळे त्यांची निवड करण्यात आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांच्या म्हणण्याकरिता कागदपत्रे तपासून पाहिले असता अपीलकर्ता श्री. सिध्दार्थ नत्थुजी शहारे यांचे अनुभव नियुक्ती झालेल्या श्री. बाळा सिताराम बोरकर यांच्या पेक्षा कमी आहे असे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती निव्वळ त्यांची नियुक्ती झाली नाही याकरिता माहिती मागितलेली आहे. मागितलेली माहिती ही छायांकिंत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिली असती तरी त्यांचे शंका निरसन झाले असते. माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता व्यक्तिशः नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांच्याकडे गेलेले आहे असे दिसून येत नाही. त्यांना माहिती दिनांक २७.४.२००७ रोजी उपलब्ध करुन घेतलेली दिसते. त्याबाबतही जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, आर्थिक वर्ष शेवट असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता विलंब झाला आहे. थोडक्यात अपीलकर्ता यांची नियुक्ती कां डावलण्यात आली याबाबत माहिती उपलब्ध करुन पाहिजे होती व तसे मुद्या क्रमांक ९ हा त्यांचा माहितीच्या अर्जात दिसून येतो. अपीलकर्ता यांना जर माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी त्यांचे शंका निरसनाकरिता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलामध्ये ज्या ११ मुद्यांच्या छायांकिंत प्रती मागितल्या आहेत त्या छायांकिंत प्रती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता त्यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून राज्य माहिती आयोगाकडील अपील मेमोमध्ये ज्या ११ मुद्यांच्या संदर्भामध्ये छायांकित प्रतीची माहिती मागितली आहे ती माहिती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत छायांकिंत प्रतीच्या स्परुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ५.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६३३-६३६/५.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११९३/२००७ मधील पुर्नविलोकन अर्ज क्रमांक १०/२००८.**

श्री. रमेश उखर्डा थिटे,
तहसीलदार,
मलकापूर, जि. बुलढाणा.
(तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला.) **..... अर्जदार**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अर्जदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ११९३/२००७ मधील आदेश क्रमांक २ मधील झालेल्या शास्तीच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपील क्रमांक ४९९/२००७ मध्ये दिनांक २०.५.२००८ रोजी पुर्नविलोकन अर्ज सादर केलेला आहे. अर्जदार यांच्या पुर्नविलोकन अर्जात त्यांनी वस्तुस्थिती विशद केलेली आहे व त्याकरिता आज आयोगाचे कार्यालयामध्ये खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. उपरोक्त विषयाचे संदर्भीय सुनावणी नोटीस नुसार मी आर. यु. थिटे, तहसिलदार, मलकापूर मा.राज्य माहिती आयोग, नागपूर यांचे समोरील माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अपील क्रमांक ११९३/२००७ श्री. गजानन तेलगोटे विरुध्द श्री. ज्ञानेश भट प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला व श्री. बी. जी. ठाकरे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला मधील आदेशावरील माझे म्हणणे पुढील प्रमाणे सादर करीत आहे. १) प्रस्तुत प्रकरणातील अपीलार्थी श्री. गजानन प्रल्हाद तेलगोटे, रा.ता. आकोट, जि. अकोला यांनी दिनांक ९.१.२००६ व दिनांक १७.१.२००६ रोजी माहितीचे अधिकार अधिनियमा अंतर्गत दाखल केलेल्या अर्जावर योग्य ते मुद्रांक लावलेले नव्हते. तसेच चालू स्थितीतील दारिद्रय रेषेखालील कार्ड किंवा पिवळया रेशन कार्डाची प्रत सादर केलेली नव्हती. त्यांनी आपले अर्जासोबत नगर परिषद, अकोट यांनी निर्गमित केलेले सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत कुटुंबाचे ओळखपत्राची प्रत दाखल केली. त्यांना प्रत्यक्ष भेटीत सन २००५ मधील सर्व्हेक्षणानुसार दारिद्रय रेषेखालील कार्ड किंवा पिवळे रेशनकॉर्डाची झेरॉक्स प्रत सादर करण्यात

सांगितले होते. त्यांनी विहित मुदतीत ते दाखल न केल्यामुळे त्यांना याबाबत दिनांक १.२.२००६ रोजी लेखी देखील कळविले. त्यांना माहिती न देण्याचा कोणताही हेतु नव्हता. २) दारिद्रय रेषेखालील व्यक्तिस कोणत्या शुल्कातून सुट देण्यात आली याबाबत त्यावेळी सदर अधिनियम नवीन असल्याने तसेच याबाबत कोणतेही प्रशिक्षण इत्यादी नसलेमुळे मी अर्जावर अर्जदाराने तिकीट न लावलेमुळे त्यास अर्ज परत पाठविले. त्यांना माहिती न देण्याचा कोणताही हेतु नव्हता. ३) सदर प्रमाणांत अर्जदार यांनी वरिष्ठांकडे दाखल केलेल्या अपीलाची कोणतीही सुचना मला मिळालेली नव्हती. मी जनमाहिती अधिकारी असलेमुळे त्यावेळी प्रथम अपीलात सुनावणी झाली असती तर वरिष्ठांचे म्हणजेच प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार त्याच वेळी माहिती अर्जदार यांना देण्यात आली असती. अशी सुनावणी प्रथम अपीलात झाली नाही ही बाबत अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे माझेवर लादण्यात आलेल्या शास्तीबाबत सहानुभुतीपुर्ण विचार करण्याची कृपा करावी. ४) मा. राज्य माहिती आयुक्त, यांचेकडील सुनावणीची नोटीस दिनांक १४.२.२००८ ही देखील मला मिळालेली नाही. दिनांक २.५.२००६ रोजी माझी तहसीलदार, मलकापूर या पदावर बदली झाल्यामुळे ती आज रोजी अकोला येथे कार्यरत असलेल्या प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांना मिळालेली होती. मला सुनावणीची नोटीस नसलेमुळे मी माझी बाजू मा. आयुक्त यांचेसमोर मांडू शकलो नाही. ५) वरील प्रमाणे सदर प्रकरणांत झालेल्या प्रथम अपीलाची कोणतीही दखल घेऊन सुनावणी न झाल्यामुळे अर्जदारास माहिती मिळू शकलेली नाही व त्यास द्वितीय अपील करावे लागले यावेळी माझी बदली मलकापूर येथे झाल्यामुळे मला प्रथम अपीलात योग्य ते मार्गदर्शन/संधी मिळाली नाही. ६) वरील सर्व मुद्यांवर मी नम्रतापूर्वक सादर करतो की, मला या प्रकरणात प्रथम अपीलात कोणतीही संधी किंवा मार्गदर्शन लाभले नाही. तसेच बदली झाल्यामुळे मला द्वितीय अपीलात देखील सुनावणीची संधी मिळाली नव्हती. या कालावधीत सदर अधिनियम हा नवीन होता. त्याबाबतच प्रशिक्षण/मार्गदर्शन देखील मिळालेले नव्हते. बऱ्याच कलमांचा अर्थ देखील निश्चित नव्हता. अशा परिस्थितीत मला प्रथम अपीलात कोणतीही संधी न मिळता सदर शास्ती झालेली असल्यामुळे माझे वरील मुद्यांचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन माझेकडून अनवधानाने झालेली चुक क्षमा करुन सदर प्रकरणातील शास्ती रद्य करण्याची कृपा करावी ही विनंती. सदरच्या खुलाश्याचे अवलोकन केले असता अर्जदार यांचे म्हणणे हे वस्तुस्थिती धरुन आहे असे दिसून येते व त्यामुळे अपील क्रमांक ११९३/२००७ मधील आदेश क्रमांक २ हा रद्य करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपील क्रमांक ११९३/२००७ मधील निर्णयातील आदेश क्रमांक २ हा रद्द करण्यात येत आहे.

२) अर्जदार व जिल्हाधिकारी, अकोला यांना निर्णयाची एक प्रत माहितीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६३७-६३९/६.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७२/२००८.

श्री. मनोहर गोपालराव मडामे,
मु. श्रीराम स्विच गीअर, प्रॉ. इंन्ड. फेस-III,
एमआयडीसी फ्युज कॉल सेंटर, शिवणी,
जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधिक्षक,
अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर असून उत्तरवादी यांनी गणपतीचा बंदोबस्त असल्यामुळे मुदतीचा अर्ज दिलेला आहे. परंतु माहिती ही उपलब्ध झाली आहे किंवा नाही हा अपीलकर्ता यांचेकडून जाणून घेऊन मुदत द्यावयाची किंवा नाही म्हणून सदरची माहिती अपीलकर्ता यांचेकडून घेतली.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याकडे दिनांक ३.१२.२००१ ला स्पेशल विषेश पोलीस महानिरिक्षक यांनी माझ्या अर्जाच्या आधारीत जी ऑर्डर केली त्याचे काय केले ती माहिती द्यावी. दिनांक ५.२.२००१ ला आकोट फाईलचे पोलीस नामे १) पी.एस.आय. श्री.झेड्. झेड्. सय्यद, २) रमेश कामले, ब.नं. १२८५ यांनी कोणाची काही नसतांना मलाच माझ्या राहते घरातून मारहाण करुन बाहेर काढले व उघडयावर सोडले. पोलीसांचे विरुध्द मा.एस.डी.पी.ओ. अकोला कडे तक्रार केली होती. दिनांक ६.२.२००१ त्यावरुन सीटी कोतवाली

... २

मार्फत मेडीकल करवून पोलीस स्टेशन, आकोट फाईल यांचेकडे पाठविली होती (तक्रार) त्याचे काय केले याची माहिती द्यावी. दिनांक २३.३.२००१ जा.क्र. ११७३/२००१ उपविभागीय कार्यालय शहर पोलीस यांनी ४४८ नुसार गुन्हा नोंदवावा व तपास करावा अशी ऑर्डर केली होती त्याचे काय केले माहिती द्यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २०.११.२००६ रोजी देण्यात आलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यापूर्वी दिनांक १०.८.२००६ रोजी पोलीस अधिक्षक, अकोला यांचेकडे गैरअर्जदार शोभाबाई, प्रविण मडामे व पोलीस यांच्या विरुध्द अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते व या अर्जाचे संदर्भातील दिनांक २०.११.२००६ ची माहिती दिसून येते. प्रथम अपील दाखल केलेले नाही. त्यानंतर दिनांक १०.१०.२००६ रोजी प्रथम अपील मुंबई येथे राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहे व सदरच्या प्रकरणात सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. पुन्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना लोकशाही दिनातील अर्जाचे संदर्भात झालेल्या चौकशीची जिल्हाधिकारी यांना दिलेल्या माहितीची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. निष्कर्ष काढतांना दिनांक ५.२.२००१ व दिनांक ६.२.२००१ चे स्टेशन डायरी मधील असलेल्या नोंदी व रिपोर्ट वरुन मनोहर गोपालराव मडामे, शोभा मनोहर मडामे व प्रविण मनोहर मडामे यांचा आपसात दिवाणी स्वरुपाचा वाद असल्याचे दिसते असे पोलीस निरिक्षक यांनी अहवाल पोलीस अधिक्षक यांना सादर केलेला आहे प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान सदरच्या माहितीमुळे झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांच्या दिनांक २५.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे स्पेशल विषेश पोलीस महानिरिक्षक यांच्या आदेशाची माहिती त्यांना जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याकडे माहिती मागितलेली असल्यामुळे तसेच दिनांक ५.२.२००१ व दिनांक ६.२.२००१ या तारखेच्या संबंधित सगळे मिळून त्यांना एकत्रित करुन ही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही. परंतु प्रथम अपील म्हणून राज्य माहिती आयोगाकडेच दोन अपीले दाखल केलेली आहेत. परंतु त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची दोनही अपीले खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ८.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६४०-६४२/८.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९६३/२००७.

श्री. हरीभाऊ झिबलराव बुध्दे,
सचिव, महात्मा ज्योतिबा फुले सहकारी
गृह निर्माण संस्था (वाघापूर),
जि. यवतमाळ. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. टी. मुनेश्वर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, यवतमाळ.

श्री. एस. पी. ढोकणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत,
वाघापूर (टेकडी), ता.जि. यवतमाळ. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांना सदरची माहिती मिळाली असल्यामुळे व त्यांचे समाधान झाले असल्यामुळे त्यांची कोणतीही तक्रार नाही व अपील खारीज करण्यात यावी असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- ९.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६४३/९.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९६२/२००७.

सौ. पद्मा किशोरराव सरपोतदार,
शिवाजी आखाडयाजवळ, वणी,
ता. वणी, जि. यवतमाळ - ४४५ ३०४. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री. अनंत टिकाराम अेकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
विवेकानंद विद्यालय, वणी,
ता. वणी, जि. यवतमाळ - ४४५ ३०४. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.९.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक ११.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ९.१०.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून विवेकानंद विद्यालय, वणी यांच्याकडे माझे मुळ सेवा पुस्तकातील खालील नोंदींच्या मा.अध्यक्ष, श्रीरामकृष्ण विवेकानंद मंडळ, वणी यांनी साक्षांकित केलेल्या प्रती १) दिनांक १.६.२००२ ते दिनांक ३०.११.२००३ पर्यंत नेमणूकीच्या आदेशाच्या नोंदी. २) दिनांक १.६.२००२ ते २८.२.२००६ पर्यंत रजा विषयक नोंदी. ३) दिनांक १.६.२००२ ते दिनांक १.१०.२००६ पर्यंत वेतन निश्चिती व वेतनवाढ याबाबत नोंदी. माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले

... २

दिसून येते.  सदरचा अर्ज हा मुख्य लिपिकांनी घेतलेला दिसून येतो.  सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक ९.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.  त्याप्रमाणे दिनांक १२.२.२००७ रोजी निर्णय देऊन मुख्याध्यापक यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविण्यात आलेले दिसते.  परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.  द्वितीय अपीलाचे सुनावणीस विद्यमान मुख्याध्यापक तथा माहिती अधिकरी हे हजर आहेत.  त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांनी ज्या वेळेस माहिती मागितली त्या वेळेस त्या स्वत: उपमुख्याध्यापक म्हणून होत्या व मुख्याध्यापक पदाचा पदभार श्री. अनंत टिकाराम अेकरे हे पर्यवेक्षक असतांना त्यांना दिला होता व त्यामुळे अपीलकर्ती यांना जी माहिती साक्षांकित करुन हवी होती ती माहिती त्यांना साक्षांकित करुन देणे कनिष्ठ म्हणून शक्य नसल्यामुळे संस्थेच्या अध्यक्षांकडून त्यांना ती साक्षांकिंत करुन पाहिजे होती.  परंतु ती त्यांना संस्थेच्या अध्यक्षांकडून साक्षांकिंत करुन मिळाली नसल्याने त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.  त्याप्रमाणे अपीलाची सुनावणीस स्वत: त्या हजर राहिल्या नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.  आज त्या उपमुख्याध्यापक नाहीत व कार्यरत पण नाहीत.  त्यांना संस्थेने बडतर्फ केले होते परंतु त्यांना शालेय न्यायाधिकरणाकडून न्याय मिळाला असून त्यांचे निवृत्ती वेतनाचे संदर्भामध्ये कालच दिनांक ८.९.२००८ रोजी कागदपत्रे त्यांनी दाखल केली व त्यांना भेटल्या त्यावेळेस त्यांनी अपीलाची सुनावणी आहे त्यासंबंधाने त्यांना सांगितले.  तरी त्या बद्यल काहीही त्यांनी सांगितले नाही व त्या आज ही हजर नाहीत किंवा आयोगास त्यांनी काहीही कळविले नसल्याने त्यांना माहितीची आवश्यकता दिसत नाही व त्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ती यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ९.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६४४-६४५/९.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११५३/२००८.

श्री. रामराव बसवंतराव देशमुख,
मु. पो. कापूसतळणी, ता. अंजनगांव सुर्जी,
जिल्हा अमरावती - ४४४ ७१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एम. भावसार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी,
जि. अमरावती - ४४४ ७१३.

श्री. एम. पी. भटकर,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत, कापूस तळणी,
ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती.

श्री. ए. डी. सरोदे,
तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, कापूस तळणी,
ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२००६ (कार्यालयास प्राप्त २८.८.२००६) रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत कापूस तळणी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

... २

(१) अ) रौदलपूर गावठाणाचा ग्राम पंचायतला चार्ज दिला तेंव्हा कलम ५१ च्या चार्ज पुस्तिकेत रौदलपूर गावठाणात चिंचेची व लिंबाची झाडे किती होती ? ब) सध्या कोणत्या जातीचे झाडे किती आहे. क) झाडे ग्राम पंचायतने ह्ऱ्यास केली असल्यास ठरावाची फोटो प्रत. ड) किती रुपयास व कोणत्या तारखेस लिलाव झाला? ई) कुणी चोरुन किंवा तोडून नेली असल्यास ग्राम पंचायतने केलेल्या कारवाईचा अहवाल. (२) अ) सराय येथे घरकुल मंजूर झालेल्या लाभधारकांची संपूर्ण यादी. ब) त्या लाभ धारकांपैकी त्या काळात ग्राम पंचायत दप्तरी नं. ८ मध्ये स्वतःचे घर होते. अशा लाभधारकांची नाववार, घर क्रमांकासह यादी. क) सध्या सराय येथे घरकुलात वास्तव्य करुन असणाऱ्या लाभधारकांची यादी. ड) प्रत्येक घरकुलाकरिता शासनाने किती अनुदान दिले. ई) सध्या किती घरकुले निवास योग्य आहेत किंवा अस्तित्वात नाहीत त्याची यादी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ११.१२.२००६ रोजी ठेवण्यात आलेली दिसून येते. परंतु सदरच्या सुनावणीकरिता गैरहजर असल्याने पुन्हा सदरची सुनावणी दिनांक २२.१२.२००६ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अर्जदाराने मुदत वाढ मागितली. त्यानंतर दिनांक २.१.२००७ रोजी उपस्थित राहण्याचे कळविण्यात येऊन सदर तारखेला सुनावणी घेतली असता अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचेशी चर्चा करुन सदरची माहिती अपीलकर्ता यांना ३ दिवसांच्या आंत जनमाहिती अधिकारी यांचेकडून देण्यात यावी असे ठरविण्यात यावे व त्यानंतर दिनांक २.१.२००७ नुसार सचिव, ग्राम पंचायत, कापूसतळणी यांना कळविण्यात आले. त्यानुसार संबंधिताकडून दिनांक ८.१.२००७ रोजी माहिती दिल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे असा खुलासा सादर केलेला दिसून येतो. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने दिनांक ८.१.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी खंड विकास अधिकारी यांना दिलेले पत्र दाखल केलेले आहे. सदरच्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता हे दिनांक ३.१.२००७ ते दिनांक ५.१.२००७ पर्यंत घरी मिळाले नाहीत व त्यांचे कुटुंबातील सदस्यांनी माहिती घेतली नाही व त्यामुळे पोस्टमार्फत अंडरपोस्टींग करुन त्यांचे घरच्या पत्त्यावर पाठविली आहे असे कळविल्याचे दिसते व त्याकरिता परिचर यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील लिहिलेले पत्र सुध्दा दाखल केलेले आहे. दिनांक ३, ४ व ५.१.२००७ अश्या तीन पत्राची प्रत आहे व त्यानंतर दिनांक ७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलामध्ये आवश्यक तथा मागितलेली माहिती न देता अनावश्यक माहिती दिली असे कारण दिलेले आहे.

... ३

३.        अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणी मध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती त्यांनी ती उपलब्ध करुन दिलेली आहे व जी उपलब्ध नाही त्याबद्यल त्यांना कळविले आहे. त्यांच्या दिनांक २५.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१ प्रमाणे ग्रामपंचायत मधील समाविष्ट गांव रौंदलपूर येथील चिंचेच्या व लिंबाचे झाडाबाबत माझे प्रभार मध्ये मला कलम ५१ चे फाईल मिळाले नाही. ग्राम पंचायत मध्ये सध्या उपलब्ध नाही. त्यामुळे माहिती देता येऊ शकत नाही. मौजा सराय येथे बांधण्यात आलेल्या घरकुल ग्रामपंचायत मार्फत बांधण्यात आले नाही. पंचायत समिती मार्फत बांधकाम झाले आहेत करिता त्यासंबंधित माहिती पंचायत समिती स्तरावरुन उपलब्ध करुन घ्यावी लागेल असे कळविण्यात आलेले दिसते. त्यावर अपीलकर्ता यांनी खुलासा सुध्दा दाखल केलेला आहे व तोंडी सुध्दा युक्तिवाद केला. त्यांच्या युक्तिवादाप्रमाणेच सन १९६५ ते १९७२ मध्ये सदरची झाडे होती असे त्यांचे म्हणणे आहे व त्याप्रमाणे ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५१ अन्वये सन १९६५ मध्ये ग्राम पंचायत, कापूसतळणी मध्ये समाविष्ट असणाऱ्या शासन मालकीच्या सर्व जागा वर्ग करण्यात आली. सदरची माहिती अभिलख्यांत असावयास पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध असावयास पाहिजे या बद्यलचा कोणताही वाद करता येत नाही. परंतु २००६ मध्ये जे ग्रामसेवक आहे त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी कळविले असल्यामुळे ती उपलब्ध आहे व ती देण्यास टाळाटाळ करित आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी अपीलकर्ता यांची आहे. मात्र त्याबाबत कोणताही पुरावा अपीलकर्ता यांनी सादर केलेला नाही किंवा खुलाश्यामध्ये सुध्दा दिलेले दिसून येत नाही. भ्रष्टाचार, अपहार उघड होऊ नये म्हणून खोटी माहिती पुरविण्यात आली असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु १९७२ ते २००६ या कालावधीत कोणत्या वर्षी झाडे ही नष्ट करण्यात आली याबद्यलची माहिती ते देऊ शकत नाही व त्यामुळे विद्यमान सचिव तथा ग्रामसेवक यांनी भ्रष्टाचार केला आहे व ती माहिती उघड होऊ नये म्हणून खोटी माहिती दिली असे म्हणता येत नाही. मुद्या क्रमांक २ मध्ये अ ते ई मध्ये मात्र सराय येथे घरकुल योजना मंजूर झाली असली तरी त्या घरकुल योजनेच्या संदर्भामध्ये जी जी माहिती उपलब्ध असेल ती मुद्ये निहाय छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. पंचायत समितीने जर योजना राबविली असेल तर लाभार्थींची यादी ही ग्रामपंचायत मध्येच असावयास पाहिजे व ती माहिती संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यामुळेच दिनांक २.१.२००७ प्रमाणे जी माहिती त्यांना

उपलब्ध करुन दिलेली दिसून येते ती अपूर्ण आहे असे दिसून येते. जी माहिती खोटी अपूर्ण आहे याबद्यल सुध्दा खुलासा दिलेला नाही. अपीलकर्ता यांनी नोटीसीत दिलेले आहे त्याप्रमाणे खुलासा करणे आवश्यक आहे. त्या खुलाशाप्रमाणे योग्य निर्णय घेता येतो. घरकुलाचे संदर्भातील अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे १९९८ जी आहे म्हणजे ती भ्रष्टाचार झाला असला तरी विद्यमान माहिती अधिकारी तथा ग्राम सचिव यांचा दुरान्वये संबंध येत नाही व त्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे ही म्हणता येत नाही. त्याबद्यल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून त्यातील ते पुन्हा माहिती मागतात अशा प्रकारे त्यांची एकूण ५८ अर्ज आले होते व त्यातून ५ प्रलंबित आहेत अशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये जरी कार्यवाही झाली व माहिती मागण्याची प्रवृत्ती असेल तर अर्थातच ती हया कायद्याची शोकांतिका आहे. कोणत्याही नागरिकास माहिती मागण्याचा अधिकार आहे. परंतु माहिती घेतांना कोणी कशाने मागावी याचे तारतम्य नसल्यास ते अस्त्र नंतर बोथड होत जाते व तशाच प्रकारचे उत्तर हे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले आहे. थोडक्यात सदरच्या अधिनियमाचा तरतुदीचा पराभव आहे. अमर्याद माहिती मागणारे आहेत असे दिसून येते. असे असले तरी प्रत्येक अर्जदारास माहिती ही अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे तेवढेच बंधनकारक आहे व सदरची मर्यादा ही जनमाहिती अधिकारी यांनी सांभाळणे आवश्यक आहे व त्यामुळे सराय येथील घरकुल संदर्भामध्ये जी जी माहिती ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध असले ती माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.६.२००६ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ मधील अ ते ई मुद्ये निहाय माहिती उपलब्ध असल्यास छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत व्यक्तिशः अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ९.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६४६-६४९/९.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८८९/२००८.**

श्री. गोपाळा मारोती पोटदुखे,
मु. चिंचगुंडी, ता. अहेरी,
जिल्हा गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. डी. पेंद्राम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख,
गडचिरोली.

श्री. एम. वाय. पठाण,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
ता. अहेरी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, अहेरी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. आपण दिनांक २०.७.२००६ रोजी खरेदी खतानुसार केलेल्या चौकशीतील खुलाशांत ३४ फूट X १८ फुट = ६१२ चौ. फुट क्षेत्र मान्य केले आहे. खुलासा क्रमांक ४ व ५ मधील मिटर व फुटांचे प्रमाण वेगवेगळे असल्याचे कारण. ३४१ चौरस फुट = ३१.६७ चौरस मिटर, २७१ चौरस फुट = २५.२० चौरस मिटर, उत्तर दक्षिण १०.१५ मिटर = किती फूट, पूर्व पश्चिम ५.६० मिटर = किती फूट. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या

... २

अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.१.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, अहेरी यांनी दिनांक २८.१२.२००४ चे मोजणीची चौकशी हि दिनांक २०.७.२००६ ला करण्यात आली असून आपणास पुरविण्यात आलेल्या क प्रतिवर आपले ताब्यात असलेले एकूण क्षेत्र व विश्वनाथ मारोती पोटदुखे यांचे वहीवाटीतील ताब्यात एकूण क्षेत्र २५.२० चौरस मीटर + ३१.६७ चौरस मीटर = ५६.८७ चौरस मिटर दर्शविण्यात आले आहे. सदरची मोजणी (प्रचलित) ही मिटर तसेच हेक्टर आर मध्ये असलेने फुटात मोजणी करण्यात आलेली नाही. अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २३.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचे सोबत उपलब्ध झालेल्या माहितीची कागदपत्रे जोडलेली नसल्यामुळे सदरचे प्रथम अपील खारीज केलेले दिसून येते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलासोबत सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००७ च्या जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांनी जोडली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दिलेल्या प्रमाणे जोडलेले नाही त्यावर अपीलकर्ता खरेदी खतामध्ये चौरस फुटमध्ये दिलेले असले तरी प्रचलित मोजणीच्या नियमाप्रमाणे मीटर मध्ये व हेक्टर आर मध्ये मोजणी येत असल्यामुळे त्याबद्यलचे रुपांतर करता येणार नाही व ही बाब अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००७ चे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे व जी पध्दती प्रचलित नाही त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व त्याबद्यलची जबाबदारी टाकता येणार नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यावरुन अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १०.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६५०-६५१/१०.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११३५/२००८.

श्री. उदय रमाकात मैत्र,
मु. पो. नागरी, ता. वरोरा,
जिल्हा चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. पी. के. मुरुमवार,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सविनय विनंती हयाप्रमाणे आहे की, श्री. खेमराज डि. भोयर, आरोग्य सेवक पुरुष हे अवैधरित्या वैद्यकीय व्यवसाय करतात. त्याबाबत वैद्यकीय अधिकारी प्राथमिक स्वास्थ केंद्र, नागरी यांनी दिनांक १.९.२००५ व दिनांक १६.९.२००५ लो असे दोन पत्र हया तारखेला श्री. भोयर यांना दिले. त्यानंतर दिनांक १९.१०.२००५ ला मी सल्लागार समितीची सभा होती त्यामध्ये

... २

अर्ज केला होता. त्या सल्लागार सभेमध्ये आपणही हजर होते व तसा ठरावही त्यांचे विरुध्द घेतला गेला व त्याला वारंवार अवैधरित्या चालवलेला व्यवसाय बंद करायला सांगितले तरीपण श्री. भोयर व्यवसाय बंद करायला तयार नाही. त्यानंतर श्री. मून साहेब दिनांक ६.७.२००६ ला चौकशी करिता आले होते व माझे बयाण घेतले. आज इतके दिवस लोटूनही त्यांचेवर कोणतीही कारवाई झाली नाही. आपणाला सुध्दा वारंवार भेटून, दुरध्वनी करुन विचारणा केली असता. आपणही हयाकडे दुर्लक्ष केले आहे. अजूनही श्री. भोयर, आरोग्य सेवकाचे काम न करता वैद्यकीय व्यवसाय करतात. तसेच मारण्याच्या धमक्या व राजकारणात सक्रीय आहे. माझ्या माहिती प्रमाणे पहिले श्री. भोयर हयांना नौकरीतून काढण्यात आले होते. असे जर चालत राहिले तर शासनाचे कोणतेही काम न होता फुकट पगार जात राहिल व जनतेच्या आरोग्याला धोका संभवतो. तेंव्हा आज पर्यंत कोणतीही कडक कारवाई (निलंबन) झाले नसल्याने मला माहितीच्या अधिकारांतर्गत श्री. भोयर हयांचेवर कोणती कारवाई केली हयाबाबत सविस्तर माहिती आपण पुरवाल अशी विनंती आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.११.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १८.१२.२००६ रोजी प्रथम अपील पुन्हा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याकडेच दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ३.१.२००७ रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यातही उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलाचे सुनावणीचे वेळेस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, श्री. खेमराज भोयर यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर त्यांना देण्यात आलेले आहे व कार्यवाही मात्र करीत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. उत्तरवादी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या तक्रारीचे अनुषंगाने श्री. खेमराज भोयर, आरोग्य सेवक (पु.) यांचे विरुध्द डॉ. व्ही. एन. मून, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी चौकशी केलेली होती व त्यातून अवैध वैद्यकीय व्यवसाय करतात हे प्राथमिक चौकशीत सिध्द झाले होते. विभागीय चौकशीच्या प्रक्रियेमध्ये प्राथमिक चौकशीमध्ये सकृतदर्शनी आरोप सिध्द होत असल्यास दोषारोप ठेवता येतात व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दोषारोप पत्र ठेवण्यात आलेले आहे असे दिनांक

३.१.२००७ रोजी कळविण्यात आलेले आहे. विभागीय चौकशी प्रक्रिया ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अर्ज केलेल्या तारखेपासून तर द्वितीय अपीलाचे निर्णयापर्यंत पूर्ण होईल किंवा नाही व त्यामुळे ज्या दिवशी अर्ज केला जातो त्या दिवशी जी वस्तुस्थिती असेल तीच कळविली जाते व त्याप्रमाणे त्या त्या वेळेस त्यांना कळविण्यात आलेले आहे. हया सर्व मुदत संपल्यानंतर त्या प्रकरणाची माहिती कळविणे अपेक्षित आहे. मुळात प्रथम अपील किंवा द्वितीय अपील हे माहितीच्या अधिकारात जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती बरोबर आहे किंवा नाही याकरिता असते व त्यावेळेस जी स्थिती होती ती त्यांना कळविली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा निष्कर्ष काढता येत नाही व विभागीय चौकशीची प्रक्रिया ही ३० दिवसात पूर्ण होईलच असेही नाही. माहितीचा अर्ज, प्रथम अपील, द्वितीय अपील ही सर्व प्रक्रिया ६ महिन्यात पूर्ण होते व त्या ६ महिन्यात अपीलकर्ता यांना विभागीय चौकशीचा निर्णय उपलब्ध होईलच असेही नाही. आज अपीलकर्ता यांचे राज्य माहिती आयोगाकडील दाखल केलेले अपीलाची सुनावणी होत असल्यामुळे दरम्यानचे कालावधीमध्ये विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण होत असल्यास ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश हे देता येतील. अन्यथा माहितीच्या अर्जात माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही एवढयापुर्ताच मर्यादित उद्येश असतो व ती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मात्र अपीलकर्ता यास जी अपेक्षा आहे त्याप्रमाणे त्यांना विभागीय चौकशीची वस्तुस्थितीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.१०.२००६ च्या अर्जामध्ये मागितलेली विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या संदर्भात माहिती ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचा निर्णय झाल्यावर कळविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १०.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६५२-६५४/१०.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९६६/२००७.**

श्री. सुरेश शंकर जांभूळकर,
पंचशीलनगर, तहसील जवळ,
डोलारा तलाव, ता. भद्रावती,
जिल्हा चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. चिलमुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नगरपालिका प्रशासन,
विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर.

श्री. अशोक गऱ्हाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, भद्रावती
जिल्हा चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या दिनांक २०.११.२००६ च्या प्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१२.२००६ रोजी देण्यात आलेला असून सदरच्या निर्णयामध्ये अपीलार्थी यांना आवश्यक असलेली माहितीचा अभिलेख प्रतिवादी यांनी अपीलार्थीस त्वरित उपलब्ध करुन देण्यात यावा. याकरिता प्रतिवादी यांनी अपीलार्थीस अभिलेख्याची पडताळणी विनामुल्य करु द्यावी व अपीलार्थी यांना आवश्यक असलेले कागद

... २

पत्राची मागणी अपीलार्थी यांनी नगरपरिषद, भद्रावती यांच्याकडे करावी व उत्तरवादी यांनी अर्ज प्राप्त झाल्या पासून ७ दिवसाचे आंत अपीलार्थीस माहिती पुरविण्याबद्यल आदेशित करण्यात येत आहे असे आदेश देण्यात आलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती पुरवितांना माहिती अधिकाऱ्यांनी शासकीय कागदांची फेरफार करण्यात आली. पुरविलेल्या माहितीत खूप तफावत दिसून येते. चुकीची माहिती पुरविली. आदेश होऊनही माहिती देण्यास नकार दिला. अपील वेळी स्वतः हजर नसणे. प्रथम अपील अर्जावरील कारणे (अपील करण्याची). ४ दिवस उशिरा माहिती मिळाली. अपील अधिकाऱ्यांनी आदेश देतांना आपल्या अधिकाराचा वापर केला नाही. आदेश ४५ व्या दिवशी दिला असे नमुद केले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाच्या प्रती दाखल केलेल्या नाही त्या अर्जाप्रमाणे त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे त्याबद्यलही आयोगाकडे कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये जी अपीलाची कारणे दिलेली आहेत त्याबद्यल सुध्दा कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही व त्यामुळे उपरोक्त प्रथम अपीलामध्ये जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १०.११.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, भद्रावती यांनी जे पत्र दिलेले आहे त्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांनी नगरपरिषदेच्या कार्यालयात उपस्थित होऊन त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पाहणी करुन व त्याप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीचे करिता अर्ज देऊन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. परंतु तसे अपीलकर्ता यांनी केलेले नसल्यामुळे व आयोगा पुढे सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल न करता व उपलब्ध झालेल्या माहिती बद्यल कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी दाखल केल्याप्रमाणे अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे त्याप्रमाणे स्वतः अभिलेखाची पाहणी करुन आवश्यक असलेल्या कागदपत्राकरिता अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६५५-६५७/११.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७०/२००७.**

श्री. रिजवान अहेमद खान मीरनवाज खान,
पशु वैद्यकीय दवाखाना, कुरणखेड,
ता. जि. अकोला - ४४४ १०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, ठाणे.

श्री. सखाराम येसू रेरे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद केंद्र शाळा, खोडाळा,
जिल्हा ठाणे. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली नाहीत व त्यांचे कार्यालयातून कोणीही हजर नाहीत. माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्र शाळा, खोडाळा, ता. मोखाडा, जि. ठाणे यांच्याकडे रिजवान खान यांचे जन्मतारखे, संपूर्ण नांव, नोंद, जन्मतारखेचे प्रमाणपत्र कोणाचे जोडण्यात आले होते बाबत माहिती मागितली. सदरचा कालावधी १९७६ ते १९७९ श्री. रिजवान खान यांचे वडिलांनी वर्ग १ पहिला मध्ये प्रवेश घेतांना जन्मतारीख बाबतचे प्रमाणपत्र

... २

कोणाचे जोडले होते त्याबाबत कार्यालयाचे पत्ता कोणी वितरित केलेले अधिकाऱ्यांचे पदनाम व पत्ता, तसेच शाळेत नांव संपूर्ण नावाची नोंद आहे किंवा कसे वडिलांचे नावाची नोंद कां घेण्यात आली नाही. माहिती डाक नोंद पोच द्वारे घेण्यात येईल असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १३.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झाला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३०.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. सदरचे पत्र पोष्टाने निर्गमित करण्यात आलेले असून जावक नोंद वहीमध्ये क्रमशः अनुक्रमांक १०० असून पत्र पाठविल्याची नोंद दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र त्यांना मिळाले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल सुध्दा घेतली नाही व निर्णय सुध्दा दिलेला नाही. अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. परंतु शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पत्राप्रमाणे त्यावेळेचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे त्यावेळेस प्रथम अपीलीय अधिकारी होते व त्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना पत्र दिलेले दिसते. असे असले तरी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे सुध्दा हजर न होता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे हे स्पष्ट होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्यलची चौकशी करुन कारणमिमांसा देणारा निर्णय देऊन माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा निर्णय देणे आवश्यक असते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी हे याबाबत उदासिन दिसून येत आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल व ती त्यांना उपलब्ध झाली नाही असे असले तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक ३०.९.२००६ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत तसेच शालेय जनरल रजिष्टरची एक छायांकित प्रमाणित प्रत ही विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे स्वतंत्रपणे माहितीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६५८-६६०/११.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७१/२००७.

श्री. बळीराम रामदास कोल्हे,
रा. वळंती (बु.), पो. धाणेगांव,
ता. नांदूरा, जि. बुलढाणा - ४४४ ३०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

श्री. योगेश उत्तम होले,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००६ रोजी राज्य शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, (सचिव, जिल्हा निवड समिती), जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे "आपल्या निवड समिती द्वारा दिनांक ११.६.२००६ रोजी कनिष्ठ लेखाधिकारी या पदाच्या मौखिक चाचणीस पात्र ठरलेल्या सर्व वर्गवारीच्या उमेदवारांच्या लेखी परिक्षेतील एकूण गुण, मौखिक परिक्षेतील एकूण मिळालेले गुण व लेखी परीक्षेच्या पेपरची सत्यप्रत व मॉडेल ॲन्सरशिट सत्यप्रत मिळणेबाबत तसेच खुल्या प्रवर्गातील मौखिक चाचणीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, जन्म तारीख व अनुभव सर्व माहिती मिळणेबाबत."

... २

सदरची माहिती पोष्टाने मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक एपिटि/२००६/प्र.क्र.२७०/आस्था-८, दिनांक २३ जून २००६ नुसार उत्तर पत्रिकेची छायांकित प्रती, पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यावर ५ दिवसांच्या आंत संबंधित उमेदवारांनी मागणी केल्यास रुपये २००/- इतके शुल्क आकारुन त्यांना देण्याबाबत उक्त आदेश आहेत. त्यानुसार आपले स्वतःची उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्राप्त करुन घेण्याकरिता या कार्यालयामध्ये २००/- रुपये भरणा करावे व इतर उमेदवारांची माहिती उक्त शासन निर्णयानुसार देता येणार नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपूर्ण माहिती दिल्या बद्यल अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००६ (प्राप्त दिनांक १९.९.२००६) रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक१०.१०.२००६ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश मुख्य लेखा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना दिलेले असून सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक २८.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याआधी दिनांक ३.८.२००७ रोजी श्री. अे. टी. तायडे, कु. ज्योती रु. मलिये, डी. डी. वक्टे यांनी त्यास माहिती उपलब्ध करुन देऊ नये अशा प्रकारची पत्रे दिलेली दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ११.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६६१-६६२/११.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७३/२००७.

श्री. विलास वामनराव लोहोटे,
बी-३/११२, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर- ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. स. ता. राणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त प्रबंधक,
लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड,
मुबई - ३२.

श्री. र. जो. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रबंधक,
लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड,
मुबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००६ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रबंधक, नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड, मुंबई यांच्याकडे (सदरच्या अर्जाची प्रत राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही) खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

... २

अर्जदाराचे विरोधात शपथपत्र व इतर माहिती देऊन तक्रारकर्त्यांनी भ्रष्ट्राचाराचा आरोप व चौकशी करण्याची विनंती केली त्यानुसार (OLA/COM/३५३३/२००१/SRC, दिनांक १९.६.२००२ च्या आदेशान्वये आपल्या कार्यालयाने (ॲन्टी करप्शन ब्युरो, भंडारा यांचेकडून मा. लोक आयुक्त कायद्याचे कलम १०(१) च्या अन्वये प्राथमिक चौकशी अहवाल मागविला) दिनांक २९.१.२००२ संदर्भ क्रमांक लोआ/कॉन/३५३३/२००१(सराच/टी-५) पत्रान्वये आपण अर्जदाराला कळविले की, प्राथमिक चौकशी अद्यापही पूर्ण झालेली नाही. त्यानंतर अर्जदाराने अंतिम अहवाल मागितला. दिनांक १२.७.२००६ संदर्भ क्रमांक माअअ/अर्ज-८८/२००६ (पा) पत्रान्वये अर्जदाराला आपण असे कळविले की, तपासी अधिकाऱ्यांच्या अंतीम अहवालाची प्रत देता येत नाही. तेंव्हा आपणास विनंती की, सदर प्रकरणातील प्राथमिक चौकशी अहवाल अर्जदाराला देण्यात यावा जेणेकरुन अर्जदाराला स्वतःची बाजू मांडता येईल कारण ॲन्टी करप्शन ब्युरो, भंडारा यांनी अर्जदाराच्या घरावर जप्ती काढून सर्व कागदपत्रे जप्त केले आहे. येथे हे उल्लेखनिय आहे की, श्रीमान परिवहन आयुक्त महोदय यांचेकडे माहितीच्या अधिकार कायद्यांतर्गत मी प्रत्यक्ष भेटीची परवानगी मागितली आहे. अशी परवानगी मला मिळाली असून तारीख अजूनपर्यंत निश्चित झाली नाही. त्यांच्या उपरोक्त भेटीमध्ये मला माझे विरुध्द खटला/केस चालविण्यात तथ्य नाही हे विहित माहितीच्या आधारे सिध्द करावयाचे आहे. माझेकडे बरीच माहिती उपलब्ध आहे. तथापि प्राथमिक अहवालाबाबतची माहिती मला मिळाल्यास मा.परिवहन आयुक्त महोदय यांचेकडे माझी बाजू अधिक समर्थपणे मांडता येईल करिता उपरोक्त माहिती मला देण्याची कृपा करावी ही नम्र विनंती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.८.२००६ रोजी आपणां विरुध्द कधीत अपसंपदे प्रकरणी खटला/अभियोग दाखल करण्या संबंधीची प्रक्रिया चालू असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(ज) मधील तरतूद विचारात घेता आपली विनंती मान्य करता येत नाही. सबब आपला प्रस्तुतचा अर्ज याद्वारे निकाली काढण्यात आला आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक २५.८.२००६ रोजी दाखल केलेले होते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते. (अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या अपील मेमोची प्रत राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दाखल केलेली नाही) प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.१०.२००६ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करुन अपील नामंजूर करण्यात आले आहे असे दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. ... ३

३.  अपीलकर्ता यांना दिनांक २४.७.२००६ रोजी माहिती मागितली होती. त्यावरुन त्यांचे विरुध्द अपसंपदेच्या संदर्भामध्ये खटला दाखल करण्याचे करिता पोलीस तपास आवश्यक असल्यामुळे त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व त्याकरिता अधिनियमाचे कलम ८(१)(ज) च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जे कळविले आहे ते योग्य आहे. कोणत्याही गुन्हयाच्या तपासाच्या संदर्भामध्ये कोणतीही चौकशी सुरु असल्यास त्याबाबतची कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येऊ नये याकरिता जो अपवाद करण्यात आलेला आहे त्यांचे कारण असे आहे की, तपास कामामध्ये ज्यांना माहिती उपलब्ध करुन दिली त्यांनी कोणताही कामास अडथळा आणता कामा नये दिल्यास तपासाची दिशा बदलू शकते व त्यामुळे दिलेले कारण बरोबर आहे. तपास एकूण पूर्ण झालेला असल्यामुळे दिलेला निर्णय हा योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील सकृतदर्शनी निकाली काढण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आता तपास संपला म्हणून त्यांचे विरुध्द न्यायालयामध्ये आरोपपत्र सुध्दा दाखल केलेले आहे. परंतु न्यायालयामध्ये त्यांच्या प्राथमिक निर्णयाची प्रत उपलब्ध झाली नाही व त्यामुळे प्राथमिक निर्णयाची प्रत आता उपलब्ध करुन देण्याचा कोणत्याही प्रकारची गोपनीयता असू नये त्याकरिता अहवालाची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी अशी त्यांची विनंती आहे. जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, मा.लोक आयुक्त कार्यालयातून सर्व कागदपत्रे ही संबंधित कार्यालयाकडे पाठविली जातात व त्यामुळे प्राथमिक चौकशी अहवाल सुध्दा ॲन्टी करप्शन ब्युरो यांचेकडे परत पाठविलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ज्या पत्राच्या अनुषंगाने ते परत पाठविली असेल त्या पत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिल्यास संयुक्तिक राहील. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या संबंधित प्रकरणातील प्राथमिक चौकशी अहवाल हा ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडे ज्या दिनांक १०.८.२००७ च्या पत्राप्रमाणे परत पाठविलेले आहे त्या पत्राची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसामध्ये विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६६३-६६६/१२.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७६/२००७.**

श्री. रुपराव शामरावजी मावंदे,
मु. पो. शिंगणापूर,
ता. दर्यापूर, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. डी. घाटोळे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपसरव्यवस्थापक (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक
पणन महासंघ मर्यादित, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे दिनांक २६.१०.२००६ रोजी त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित यांच्याकडे माहिती मागण्यासाठी अर्ज दाखल केला होता. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी मुख्य राज्य माहिती आयोग यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे असे नमुद केलेले आहे व त्यानंतर नागपूर येथील कार्यालयात पुन्हा अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलाचे संदर्भामध्ये सुनावणी करतांना अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जाची प्रत किंवा प्रथम अपीलाची प्रत, प्रथम अपीलाचा निर्णय सादर करावा असे विचारले असता त्याबद्यल त्यांनी काहीही सांगितले नाही. मात्र दिनांक १७.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक यांनी अपीलकर्ता श्री. रुपराव शामराव मावंदे यांना कळविलेल्या पत्राची प्रत त्यांनी दाखल केलेली आहे. त्यामध्ये अपील दिनांक ३.३.२००७ चा संदर्भ दिसून

... २

येतो. उपरोक्त संदर्भीय विषयान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) अन्वये अपील सादर केलेले असून आपण कापूस विक्रीचा ३% रकमेचा चेक मिळणेबाबत विनंती केलेली आहे. याबाबत सहाय्यक माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, अमरावती यांना प्र. का. ने दिनांक ३.३.२००७ अन्वये सदरची माहिती त्वरित सादर करणेबाबत कळविलेले होते. सहाय्यक माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, अमरावती यांनी कळविले आहे की, आपण जोपर्यंत कै. शामराव जयरामजी मावंदे (मयत शेतकरी) यांचे वारस असल्याबाबत हमीपत्र व प्रमाणित प्रतिज्ञा लेख सादर करीत नाही तोपर्यंत आपणास चेक देता येणार नाही. तरी आपण वरील प्रमाणेची पुर्तता त्वरित करावी. जेणेकरुन आपणास कापूस विक्रीचा ३% रकमेचा चेक देणे सोयीचे होईल. यापुढील पत्र व्यवहार आपण कृपया सहाय्यक माहिती अधिकारी, अमरावती यांचेशी करावा. पुन्हा दिनांक १२.३.२००७ चे पत्र जोडलेले दिसून येते. सदरचे पत्र हे उपव्यवस्थापक तथा माहिती अधिकारी प्रधान कार्यालय, नागपूर यांना दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी कक्ष अधिकारी (पणन), मुंबई, सरव्यवस्थापक, मुंबई व व्यवस्थापक, प्रधान कार्यालय, मुंबई अशी दिलेली दिसून येते. प्राथमिक वारसपत्राची छायांकिंत प्रत दाखल केलेली आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना नेमकी कोणती माहिती मागितली, त्यांना ती केंव्हा मिळाली, प्रथम अपील केंव्हा दाखल केले, त्याचा निर्णय केंव्हा मिळाला याबद्यल काहीही उल्लेख नाही. मात्र महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, प्र. का. नागपूर यांचेकडून माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक (ख. प्र.) प्र. का. नागपूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे श्री. रुपराव मावंदे यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज या कार्यालयास महाराष्ट्र शासनाच्या पणन खात्याकडून प्राप्त झाल्यावर त्यांना महिती देण्यांत आलेली आहे. श्री. रुपराव मावंदे यांनी कलम क्रमांक १९ अन्वये प्रथम अपील महासंघाचे जनअपीलीय अधिकारी, अमरावती किंवा जनअपीलीय अधिकारी, प्रधान कार्यालय, नागपूर यांना करणे बंधनकारक आहे. श्री. मावंदे यांनी महासंघाचे कार्यालयात प्रथम अपील केलेले नाही. त्यामुळे सदर द्वितीय अपील असंवैधानिक व नियमबाहय असून ते फेटाळण्यांत यावे हि विनंती. उपरोक्त विषयानुसार सविनय वस्तुस्थिती खालील प्रमाणे सादर करीत आहोत. कास्तकारांना महासंघातर्फे कापूस उत्पादकांचे ३% जमा असलेली रक्कम परत करतांना अमरावती विभागात सहकारी खरेदी विक्री संघ, दर्यापूर यांचे द्वारा कै. शामराव जयरामजी मावंदे यांचे चेक रुपये २४७४/- व रुपये २९५६/- असे एकूण रुपये ५४३०/- चे चेक श्री. संजय

रामराव मते यांनी नेऊन वटविले होते. श्री. रुपराव मावंदे यांनी त्यांच्या वडिलाचे चेक गहाळ झाल्याबाबत तक्रार केल्यामुळे अमरावती विभागातर्फे पोलीसात तक्रार करण्यांत येऊन सदरील रक्कम रुपये ५४३०/- संबंधिताकडून वसूल करण्यांत आले. कै. शामराव जयरामजी मावंदे मयत झालेले असल्यामुळे अमरावती विभागातर्फे अपीलकर्ता रुपराव मावंदे यांना नियमाप्रमाणे ते वारसदार असल्याबाबतचे आवश्यक कागदपत्रे प्रतिज्ञा लेखासह संबंधित उपविभागीय कार्यालयास सादर करुन त्यांच्या वडिलांच्या ३% रकमेचा चेक घेऊन जाणे बाबत सांगण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती विभागीय कार्यालय, अमरावती व प्रधान कार्यालय, नागपूर यांचेकडून वारंवार कळवून सुध्दा श्री. रुपराव मावंदे यांनी ते वारस असल्याबाबतची वर नमूद केलेली कागदपत्रे सादर केलेली नाही. उलट श्री. रुपराव मावंदे यांनी त्यांच्या वडिलाचा चेक अवर सचिव, सहकार व वस्त्रोद्योग विभाग यांच्या मार्फत पाठविण्याचा आग्रह धरलेला आहे. महासंघातर्फे श्री. रुपराव मावंदे यांना त्यांच्या वडिलांच्या ३ % रकमेचा चेक देण्यांत काहीही अडचण नाही. मात्र नियमानुसार श्री. रुपराव मावंदे हे वारसदार असल्याबाबतची कागदपत्रे त्यांनी महासंघास सादर करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत श्री. रुपराव मावंदे यांना प्रधान कार्यालय, नागपूर व विभागीय कार्यालय, अमरावती तर्फे वेळोवेळी वरील प्रमाणे माहिती पाठविण्यां विषयी कळविले होते. त्यांना त्यांच्या मय्यत वडीलांच्या नावाच्या कै. शामराव मावंदे यांचे नावाचा चेक मिळण्यास्तव ते वारसदार असल्याचे कागदपत्र सादर करणे बाबत कळविले होते. त्याप्रमाणे श्री.रुपराव मावंदे यांनी ते वारसदार असल्याचे कागदपत्र विभागीय कार्यालय, अमरावती येथे दिलेले होते व त्यानंतर त्यांना ३% रक्कमेचा चेक सुध्दा विभागीय कार्यालय, अमरावती तर्फे देण्यांत आलेला आहे. त्याची पोहोच पावती सोबत जोडली आहे. खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली त्यांना त्याकरिता त्रास झाला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी ज्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाचे कार्यालयामध्ये सुध्दा अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे कागदपत्रे दाखल केलेली नाही किंवा अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे प्रथम अपील सुध्दा दाखल केलेले नाही व त्यामुळे जरी आयोगाने नोटीस काढून अपीलाची चौकशी घेतली आहे. अपीलकर्ता यांची तक्रार चेक मिळाला त्याबद्यल नसून विलंबाने मिळाला असे दिसते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती असते त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडून कागदपत्रे

... ४

छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे असे अपेक्षित आहे. मात्र अपीलकर्ता यांनी अपील मेमोमध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये तक्रार करुन शास्ती लादावी अशी विनंती केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये अनियमितता झाली असली तरी त्याबद्दल कोणत्याही प्रकारची शास्ती लादण्याची तरतुद नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी लेखी दिलेले असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी सुध्दा तोंडी मंजूर केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांनी अपील मेमोमधील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भातील अनियमिततेच्या बद्दल केलेली विनंती मान्य करता येत नाही.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६६७-६७०/१२.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७७/२००७ व अपील क्रमांक १९७८/२००७.

श्री. विलास वामनराव लोहोटे,
बी-३/११२, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर- ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,
मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला माळा,
पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी,
मुंबई - ४०० ०१३.

श्री. आर. एच. गौतम,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,
मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला माळा,
पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी,
मुंबई - ४०० ०१३. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२००८)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००६ व दिनांक १८.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १५.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक १९७७/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे खालील

... २

प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्रीमान डॉ. शशिकांत कर्णिक साहेब, माजी अध्यक्ष, एम.पी.एस.सी. यांना भ्रष्ट्राचार प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत नोंदविण्यात आलेल्या गुन्हयात (u/s/३-१(e) च्या चौकशी दरम्यान त्यांच्या Chartered Accountant ला परवानगी दिली. अश्या प्रकारची बातमी दिनांक २९ जुलै, २००२ च्या लोकमत वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. तेंव्हा श्री. कर्णिक यांना त्यांच्या Chartered Accountant ची मदत घेण्याची परवानगी दिली होती काय ? दिली असल्यास कुठल्या तरतुदी अंतर्गत दिली याची माहिती पुरविण्यात यावी हि नम्र विनंती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र त्यानंतर दिनांक १८.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती आढळून आली नाही अशा प्रकारचा अर्ज दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना पुन्हा दिनांक १८.९.२००६ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिनांक २१.९.२००६ रोजी देण्यात आलेली दिसते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलाच्या सुनावणीचे वेळेस जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये डॉ. शशिकांत कर्णिक यांनी Chartered Accountant ची मदत घेण्याची परवानगी दिलेली नव्हती असे आढळून आलेले नसल्यामुळे तशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा डॉ. शशिकांत कर्णिक यांना Chartered Accountant ची मदत घेता यावी यासाठी परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला नव्हता हे मान्य केले व त्याकरिता त्यांनी वर्तमानपत्राचे कात्रण सादर केलेले आहे. परंतु वर्तमान पत्राचे कात्रणावरुन लेखी परवानगी दिली होती असे सिध्द होत नसल्यामुळे व तसे अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे मान्य केलेले असल्यामुळे जी माहिती उपलब्ध झालेल्या अभिलेखामध्ये अस्तित्वातच नाही ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक १९७८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, प्रशासकीय इमारत, नागपूर-१ यांच्याकडे सन १९८५ ते १९.१२.१९९४ पर्यंत ॲन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ क्रमांक ७०१, दिनांक

८.८.२००१ अन्वये केलेला अंतिम आदेश निष्कर्ष उपलब्ध करुन द्यावा. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केलेले दिसते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही दिनांक २०.१२.२००६ रोजी पुरविण्यात आलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पत्र क्रमांक ७०१ मध्ये सहपत्र १ ते २१५ असा उल्लेख नसल्याने ती सर्व कागदपत्रे मात्र उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याकरिता त्यांनी दिनांक ६.१.२००७ रोजी प्रथम अपील सुध्दा दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.१.२००७ रोजी देण्यात आली असून सदरची कागदपत्रे कोणत्या कार्यालयात सदर कागदपत्रे आहेत अशा प्रकारे शहानिशा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या अर्जामध्ये पत्र क्रमांक ७०१ अन्वये केलेला अंतिम आदेश व निष्कर्ष उपलब्ध करुन द्यावा असे स्पष्टपणे असल्यामुळे त्यांनी आदेश व निष्कर्षाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे आता असे आहे की, ज्या सहपत्रांचा उल्लेख केला त्या सर्व सहपत्रांच्या छायांकिंत प्रती त्यांना उपलबध करुन देण्यात याव्या. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या सहपत्रांची छायांकित प्रतीचा खर्च भरणे आवश्यक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपील क्रमांक १९७७/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १९७८/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून आयोगापुढे त्यांनी केलेल्या तोंडी विनंती प्रमाणे त्यांना पत्र क्रमांक ७०१ मध्ये नमुद केलेल्या सहपत्रांच्या छायांकिंत प्रती हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसांचे आंत यवतमाळ येथील कार्यालयातून मागवून रुपये २/- प्रती प्रमाणे खर्च भरुन घेऊन उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १५.९.२००८**
HIREKHAN/BHUJI/६७१-६७३/१५.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८२/२००७.

श्री. प्रा. यशवंत तुकाराम मेश्राम,
पुजा किराणा स्टोअर्स जवळ,
पंचशील नगर, कॅम्प पोस्ट ऑफीस,
अमरावती. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय,
हार्ट हॉस्पीटल जवळ, मार्डी रोड,
अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय,
हार्ट हॉस्पीटल जवळ, मार्डी रोड,
अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक ८.१०.२००७ रोजी घेण्यात आली अपीलकर्ता हजर होते. परंतु अमरावती येथील शारिरीक शिक्षण महाविद्यालय या वर्षा पासून बंद असल्यामुळे सदरची नोटीस तामील करता आली नाही. सबब नोटीस साभार परत करण्यात येत आहे असे शाबीर खॉ पठाण व सुरेश वानखडे, कोतवाल विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी अहवाल दिला होता. परंतु अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले होते की, महाविद्यालय सुरु आहे. ते स्वतः प्राध्यापक म्हणून सदरच्या संस्थेत कार्यरत असून रजा घेऊन आलेले होते. राज्य माहिती आयोगाचे अमरावती येथे कॅम्प दिनांक ८.१०.२००७ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवण्यात

... २

आले होते व त्या अनुषंगाने अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जनमाहिती तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, हॉर्ट हॉस्पीटल जवळ, मार्डी रोड, अमरावती यांना अपील क्रमांक ४८२/२००७ च्या सुनावणीस उपस्थित राहावे असे कळविण्यात आले होते. परंतु महामहीम मा. राष्ट्रपती यांचा दौरा अमरावती येथे त्या काळात असल्यामुळे सदरची सुनावणी अमरावती ऐवजी रविभवन, नागपूर येथे घेण्यात येईल अशा प्रकारची नोटीस प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जनमाहिती अधिकारी यांना हॉर्ट हॉस्टीटल जवळ, मार्डी रोड, अमरावती या पत्त्यावर दिनांक १२.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयाकडून काढण्यात आली होती. परंतु सदरची नोटीसीप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य हे रविभवन, नागपूर येथील कार्यालयात हजर राहण्याचे ऐवजी पूर्वीच्या नोटीस प्रमाणे अमरावती येथील शासकीय विश्रामगृह येथे हजर राहिले होते असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना दिनांक १२.९.२००७ ची नोटीस मिळाली नाही असे प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांनी दिनांक ८.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात तार करुन ते अमरावती येथील विश्रामगृह येथे सकाळी १०.३० ते ११.२० पर्यंत स्वतः हजर होतो. परंतु कोणतेही अधिकारी याकरिता आपले तर्फे हजर नव्हते. म्हणून आपणास माहितीकरिता सादर असे त्यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे त्याच दिवशी पुन्हा सुनावणी लावावी असा आदेश राज्य माहिती आयोगाने दिला होता. परंतु त्याच दिवशी दिनांक ८.१०.२००७ रोजी द्वितीय अपीलाचा निर्णय उत्तरवादी हजर नसल्यामुळे एकतर्फी देण्यात आला होता. कारण तसा अहवाल अमरावती विभागीय आयुक्त यांचे कार्यालयातील साबीर खॉ पठाण व सुरेश वानखडे, कोतवाल यांनी नोटीस बजावणी संदर्भात दिला होता. त्याकरिता दिनांक १९.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून अपीलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांना अपील क्रमांक ४८२/२००७ मध्ये फेर सुनावणीबाबत प्रकरणात दिनांक २९.११.२००७ रोजी रविभवन, सिव्हील लाईन, नागपूर येथे आयोगाचे कार्यालयात सकाळी १०.३० वाजता हजर राहावे असे कळविण्यात आले होते व स्थळ बदलण्याचे कारण सुध्दा त्यांना कळविण्यात आले होते. परंतु तत्पुर्वीच अमरावती शारिरीक शिक्षण मंडळ, अमरावती यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर येथील खंडपीठात रिट पिटीशन नंबर ४८४३/२००७, दिनांक १८.१०.२००७ रोजी त्यांना सुनावणीची संधी दिली नाही या कारणास्तव दाखल करुन दिनांक १९.१०.२००७ रोजीच मा. न्यायमुर्ती श्री. चौधरी यांचेकडे दाखल सादर झाले असता मा. न्यायमुर्ती यांनी दिनांक ८.१०.२००७ च्या निर्णयास स्थगिती

दिली होती. सदरच्या स्थगितीचा निर्णय हा दिनांक ८.८.२००८ रोजी शासकीय अधिवक्ता यांनी राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, रविभवन, नागपूर या कार्यालयात कळवून दिनांक २९.११.२००७ ची सुनावणी घेतली नव्हती. आता मा.उच्च न्यायालयाचे मा.न्यायमुर्ती श्रीयुत ए. पी. लवांदे यांनी अपीलकर्ता यांचे अपीलाची पुन्हा सुनावणी घेऊन जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय व प्रथम अपीलीय अधिकारी, अमरावती शिक्षण प्रसारक मंडळ यांना पुन्हा संधी द्यावी ही पिटीशनर यांची विनंती मान्य करुन दिनांक ३०.६.२००८ रोजी निर्णय दिलेला होता. सदरच्या निर्णयाची माहिती ही राज्य माहिती आयोगास दिनांक ८.८.२००८ रोजी कळविण्यात आली होती व त्याप्रमाणे अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अमरावती शारिरीक शिक्षण मंडळ, अमरावती यांना त्यांच्या मा.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन नंबर ४८४३/२००७ मध्ये जो पत्ता दिलेला आहे त्या पत्त्यावर नोटीस काढावी असा आदेश दिल्यामुळे तशा प्रकारची नोटीस राज्य माहिती आयोगाचे उपसचिव यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी काढून सदरच्या अपील प्रकरणाची फेर सुनावणी दिनांक १५.९.२००८ रोजी दुपारी २.०० वाजता रविभवन, कक्ष क्रमांक २०, सिव्हील लाईन, नागपूर येथे ठेवण्यांत आलेली आहे. सदर सुनावणीस संपूर्ण कागदपत्र व पुराव्यासह वेळेवर हजर राहावे. गैरहजर राहिल्यास एकतर्फी नोंद घेण्यात येईल अशी नोटीस काढण्यात आली आहे. त्याप्रमाणे आज अपीलकर्ता हे हजर आहेत. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी, अमरावती शारिरीक शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती तसेच जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय यांना नोटीस काढण्यात आली असूनही जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती व प्रथम अपीलीय अधिकारी, अमरावती शारिरीक शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती हे हजर राहिले नाहीत व त्याबद्यल आयोगास त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

२. वास्तविक सदर अपील क्रमांक ४८२/२००७ च्या सुनावणीकरिता प्रथम अपीलीय अधिकारी तथा तथा अध्यक्ष/सचिव, अमरावती शारिरीक शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती यांना त्यांच्या दिलेल्या पत्त्यावर नोटीसेस काढली होती. अमरावती येथील कॅम्प होऊ शकणार नाही व तो बदल जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना वर नमुद केल्याप्रमाणे आयोगाचे कार्यालयातून दिनांक

१२.९.२००७ रोजी नोटीसेस काढून दिनांक ८.१०.२००७ रोजी अमरावती ऐवजी रविभवन, नागपूर येथेच सुनावणी घेण्यात येईल असे कळविण्यात आले होते. त्या नोटीसस त्यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही. मात्र अमरावती येथील रद्द करण्यापुर्वीच्या नोटीस प्रमाणे मात्र ते अमरावती येथील विश्रामगृहात हजर झाले व त्यानंतर हजर राहिलो अशी तार करुन कळवितात. सुनावणीचे स्थळ बदल्यानंतर विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्यांचे कार्यालयातून सुध्दा नोटीस बजावण्याची जबाबदारी घेतली होती. परंतु त्याच्या कार्यालयातील श्री. साबीर खॉ पठाण व श्री. सुरेश वानखडे, कोतवाल यांनी अमरावती येथील शारिरीक शिक्षण महाविद्यालय या वर्षा पासून बंद झाल्यावरुन सदर नोटीस तामील करता आली नाही असा अहवाल दिला अर्थात त्याकरिता विभागीय आयुक्त, अमरावती यांना सदरच्या दोन्ही कर्मचाऱ्यां विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याकरिता व तशी त्यांनी कार्यवाही केल्याचे आयोगास कळविले होते. वास्तविक अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००६ रोजी सुध्दा जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री. अभय नागीनचंद बुच्चा, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, हार्ट हॉस्पीटल जवळ, मार्डी रोड, अमरावती यांच्याकडे माहिती मागितली होती व त्या संदर्भातील तक्रार/अपील - २९३/२००२ हे मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे सुनावणी घेऊन दिनांक १०.११.२००६ रोजी अपील मान्य करण्यात येऊन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला होता. परंतु त्या निर्णयाचे सुध्दा पालन जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी केलेले नव्हते. सहाय्यक कुलसचिव (म.वि.), संत गाडगे बाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी सुध्दा दिनांक १७.८.२००६ रोजी प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत असणारा कायदा अस्तित्वात आलेला आहे. तरी सदर कायदा वाचून त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशा प्रकारे कळविण्यात आलेले दिसते. परंतु तरीही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दिनांक २९.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती दिली असेही त्यांनी कळविलेले दिसून येते व त्याबद्यलची कागदपत्रे कार्यालयात दाखल करतात. त्याच प्रमाणे लेखी युक्तिवाद सुध्दा दिनांक २८.७.२००७ रोजी कार्यालयात दाखल करतात. परंतु अपीलाचे सुनावणीस मात्र ते हजर राहत नाहीत व त्यांनी मा. उच्च न्यायालयाचे निर्णया पूर्वीच दिनांक ८.१०.२००७ च्या संदर्भामध्ये पुन्हा सुनावणीची संधी दिनांक २९.११.२००७ रोजी ठेवण्यास फेर सुनावणीचा निर्णय घेतला होता तरी मा.

न्यायालयात जाऊन आदेश रद्य करुन घेतली वास्तविक आयोगाने स्वतः दिनांक ८.१०.२००७ च्या निर्णय हा फेर विचारासाठी घेतला होता. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही या कारणावरुन निरनिराळया सबबीखाली ते सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता ते टाळतात अशी आयोगाची खात्री झाली आहे. आयोग फेर सुनावणीस तयार असून त्या तारखेस स्थगिती आदेश मिळविणे व पुन्हा फेर सुनावणीची संधी दिली असे मा. न्यायालयाकडे विनंती करणे व पुन्हा फेर सुनावणीची मागणी करणे व पुन्हा त्या सुनावणीस हजर न राहाणे यावरुन मा. उच्च न्यायालयाची सुध्दा दिशाभूल करण्याची उत्तरवादी यांची हिंमत दिसून येते. अन्यथा आज सुध्दा आयोगाने मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे फेर सुनावणी ठेवली असतांना सुध्दा ते गैरहजर राहिले नसते व त्यावरुन आयोगाने दिनांक ८.१०.२००७ रोजी जो निर्णय दिलेला होता तो योग्यच होता असे दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.२.२००६ च्या अर्जात मागितलेली माहिती मुख्य माहिती आयुक्तांच्या निर्णय असून सुध्दा जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांनी पालन केलेले नाही. सुनावणीस हजर राहण्याचे टाळतात व दिनांक ८.१०.२००७ च्या निर्णयास मा.उच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळवून पुन्हा मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे फेर सुनावणी ठेवली असता हजर राहत नाही व यामुळेच प्राचार्य तथा जनमाहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करीत आहेत असा आयोगास निष्कर्ष काढावा लागतो. माहिती उपलब्ध करुन दिली असती तर आयोगापुढे येऊन तसे प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे सांगणे जरुरीचे असते. कारण अधिनियमाच्या कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी हे राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांवर असेल अशी तरतुद आहे. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन न देता व अपीलकर्ता यांना आयोगापुढे वारंवार अपील करणे भाग पाडीत असल्यामुळे अपीलकर्ता यांना आयोगापुढे हजर राहण्याचा खर्च अमरावती ते नागपूर यावे लागते. तसेच दिनांक १६.२.२००६ पासून मानसिक त्रास भोगत असल्यामुळे व सध्या आजारी असल्यामुळे अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे त्यांना रुपये ५,०००/- चा आता पर्यंत प्रवासाचा खर्च व नागपूर येथील खर्च सुध्दा देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

... ६

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झाली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- शास्ती लादण्यात येत आहे.

३) जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालय, अमरावती व अमरावती शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती हे आयोगाचे आदेश पालन करीत नसल्यामुळे त्यांचे विरुध्द सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी योग्य ती कार्यवाही करावी व त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत त्यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १५.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९८३/२००७.

श्री. विजय वसंत रोकडे,
द्वारा- श्री. रामकृष्ण माहूरकर,
टंडन वार्ड, महाल,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. अजीत देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. प्रमोद शेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
राजीव गांधी महाविद्यालय,
सडक अर्जुनी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १६.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी हे सुनावणीनंतर हजर झालेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००६ रोजी प्राचार्य तथा माहिती अधिकारी, राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जुनी, जि. गोंदिया यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) आपल्या महाविद्यालयात प्रात्यक्षिकांसह असलेले किती विषय शिकविले जातात व कोणते ? २) सन १९९९-२००० ते २००५-२००६ पर्यंत विद्यापीठा तर्फे प्रात्यक्षिकांच्या साहित्य खरेदी करीता किती अनुदान प्राप्त

... २

झाले, त्यासंबंधी माहिती (विषयानुसार). ३) प्रात्यक्षिकांकरिता खरेदी केलेल्या रुपये २०००/- व त्यापेक्षा अधिक किंमत असलेल्या साहित्यांची यादी व खरेदी केलेले वर्ष. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००७ रोजी प्रथम अपील मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा मिळालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी तोंडी सांगितले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी हे त्यावेळेस सहसंचालक, उच्च शिक्षण नसून महाविद्यालयातच प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्राचार्य यांची नियुक्ती झाली असल्यामुळे त्याप्रमाणे दिनांक ८.२.२००७ रोजी सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी प्राचार्य, राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जुनी, गोंदिया यांना अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती देणे बंधनकारक आहे व प्राचार्य स्वतः प्रथम अपीलीय अधिकारी आहेत अशा प्रकाराचे पत्रातून आदेश दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. त्याकरिता सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक १३ जानेवारी २००६ रोजी सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानीत महाविद्यालये, नागपूर विभाग, नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदीप्रमाणे सहाय्यक माहिती अधिकारी, माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचे नियुक्ती संदर्भामध्ये आदेश दिलेले आहेत. त्यानंतर दिनांक २७.६.२००६ रोजी सुध्दा वर नमुद केलेल्या प्राधिकरणाची नियुक्तीबाबत अहवाल पाठवावा असे कळविण्यात आलेले दिसून येते व त्यावरुन महाविद्यालयातच जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. परंतु अपीलकर्ता यांना मात्र कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे शास्तीस सुध्दा पात्र आहेत व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आत त्यांच्या दिनांक २१.१०.२००६ च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जुनी, जि. गोंदिया यांनी छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची रक्कम त्यांच्या दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" मध्ये जमा करावे.

३) सदरच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचेकरिता निर्णयाची एक प्रत सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६८०-६८२/१६.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९८५/२००७.

श्री. राजकुमार मोतीराम खेडकर,
द्वारा- श्री. जे. एम. गिरी,
नगरपरिषद कॉलनी,
गांधीनगर पोष्ट ऑफीस,
अकोला - ४४४ ००४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्था,
अमनखॉ प्लॉट, शास्त्रीनगर,
अकोला.

श्री. मधुकर रघुनाथ पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्था,
अमनखॉ प्लॉट, शास्त्रीनगर,
अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १६.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. सुरेश एम. लढ्ढा, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.९.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, विदर्भ ग्रामीण

... २

शिक्षण संस्था, अकोला यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अ) कनिष्ठ महाविद्यालयातील द्विलक्षीय अभ्यासक्रमाला सत्र १९९६-१९९७ ते २००४-२००५ मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पत्ते व इतर माहिती हजेरी पत्रकात नमुद केल्याप्रमाणे झेरॉक्स प्रत व शिक्षण फी, वर्कशॉप फी, भरलेल्या पावत्याची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. ब) संस्थेतील श्री. संजीव पांडुरंग नागे (सहाय्यक शिक्षक) व श्री. एस. पी. जाधव (सहाय्यक शिक्षक) यांच्या नियुक्तीबाबत संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत व त्यांची मस्टरवर नोंद व सहया असलेली संबंधित दोन महिण्याची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. क) संस्थेतील श्री. के. पी. घाटोळ (शिपाई) या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती बाबतची संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत. ड) संस्थेतील श्री. प्रमोद रामदास ताडे (निदेशक) यांच्या नियुक्तीच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. इ) संस्थेतील श्री. एन. बी. कुळकर्णी या कर्मचाऱ्याला पत्र जावक क्रमांक ४१४४ किंवा क्रमांक ४१४२, दिनांक १०.६.१९९९ रोजी सेवामुक्त केले होते. त्याप्रमाणे संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. फ) संस्थेतील श्री. जी. एस. किरतकार (निदेशक) व श्री. व्ही. डी. घाटोळ (निदेशक) यांना दिनांक ३०.४.२००१ रोजी सेवानिवृत्त केले होते. त्याप्रमाणे संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्या बाबत. च) मा.प्राचार्यांनी एम.सी.व्ही.सी. विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या ४०-४०-५०-५० असाधारण रजा गैरहेतुनी लावल्या परंतु त्याच्या नोंदी सेवापुस्तकात घेतल्या नाही असा माझा समज आहे. करिता सर्व सेवापुस्तकांच्या नोंदींची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. छ) कार्तीक मनोहर देशमुख या विद्यार्थ्याला बोगस गुणपत्रिकेच्या आधारावर एम.सी.व्ही.सी. विभागात इयत्ता १२ वी मध्ये प्रवेश दिला. त्या गुणपत्रिकेची व टी.सी.ची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. ज) एम.सी.व्ही.सी. विभागातील कर्मचारी मस्टरची माहे एप्रिल २००१, जुन २००१, जुलै २००१ व ऑगष्ट २००१ ची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. झ) संस्थेनी दिनांक ३०.४.२००४ रोजी एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रमाची मान्यता संपत असल्याचे कारण पुढे करुन सर्व कर्मचाऱ्यांना सेवामुक्त केले. तसेच मला सुध्दा सेवामुक्त केले. त्याबाबत संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. त्र) वरील सेवामुक्त केलेल्या इतर कर्मचाऱ्यांना जुलै, ऑगष्ट २००४ मध्ये पुन्हा नियुक्त केले. त्याबाबतची संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. ट) मला आपल्या संस्थेच्या सन २००० मध्ये कायम केले असून ठरावाची प्रत प्राप्त झाली आहे त्याप्रमाणे दुसऱ्या वेतनवाढीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. परंतु सेवेत कायम करण्यात आल्याचा आदेश महाराष्ट्र शासन निर्णय

... ३

क्रमांक अमाशा-४१८८-क, दिनांक १५.७.१९८८ प्रमाणे देण्यात आला नाही किंवा त्याप्रमाणे मला प्राप्त झाला नाही त्या आदेशाची प्रत मिळण्याबाबत. ठ) आपल्या कार्यालयाचा खुलासा जा.क्र. ६०८४, दिनांक २.९.२००५ च्या पत्रातील परिच्छेद चारमध्ये नमुद केले आहे की, श्री. खेडकर यांनी नमुद केलेल्या कालावधी मध्ये ५० ते ६० बिनपगारी सुटया नाहीत, त्या सुटयाची संख्या प्रत्यक्षात १५ आहे व तशा पध्दतीने शाळा समितीची मान्यता घेतली आहे असे कळविले आहे. याबाबतची शाळा समितीच्या मान्यतेची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. (आपल्या माहिती करिता पत्राची झेरॉक्स प्रत सोबत जोडत आहे) ड) मा.प्राचार्य श्री.एस.आर.पाटील आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सन १९८६ पासून प्राचार्य पदावर आहेत त्यांच्या नियुक्तीस शासनाकडून प्रदान केलेल्या मान्यतेची झेरॉक्स सत्यप्रत मिळण्याबाबत. ढ) शिवर येथील एम.सी. व्ही.सी. विभागामध्ये १६.११.२००५ पर्यंत विद्युत पुरवठा नव्हता तरी सुध्दा प्रात्याक्षिक अभ्यासक्रमाचे काम कसे चालले या विषयी माहिती देणारा हस्तलिखित अभिलेख मिळण्याबाबत. त) दिनांक ३१.१२.१९९७ रोजी संस्थेद्वारे परीविक्षाधिन कालावधी करिता मला नियुक्ती आदेश दिलेला होता. मध्येच पुन्हा २२.६.१९९८ रोजी माझा नियुक्ती आदेश रेकॉर्डला कसा आला याबाबतचा अहवाल देण्यात यावा, या संदर्भात आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्या व २२.६.१९९८ च्या नियुक्ती आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी. थ) दिनांक ३१.१२.१९९७ रोजी एम.सी.व्ही.सी. विभागात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती संदर्भात संस्थेच्या ठरावाची सत्यप्रत मिळण्याबाबत. द) एम.सी.व्ही.सी. विभागातील कर्मचारी नियुक्तीकरिता दिनांक २०.११.१९९७ रोजी मुलाखत घेतली व मुलाखतीचा अहवाल प्राचार्यांनी तयार केला त्या अहवालानुसार सर्व पदाकरिता (जाहिरातप्रमाणे) उमेदवारांच्या मुलाखती झाल्या. परंतु नियुक्ती मात्र बिल्डींग मेंटनन्स या विषयाचे शिक्षक, निर्देशक, शिक्षक (एम.आर.ई.डी.ए.) शिक्षक (ॲग्रोकेमीकल) व लिपिक यांच्याच करण्यात आल्या या संदर्भातील मुलाखतीचा अहवाल मा.सह.धर्मदाय आयुक्त, अकोला विभाग, अकोला यांच्या मार्फत संस्थेकडून डिसेंबर, २००४ मध्ये प्राप्त झाला आणि नियुक्ती मान्यता प्रस्तावा सोबत जोडलेल्या कर्मचारी उमेदवारांच्या मुलाखत अहवालाच्या प्रती. मा. सह.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत एप्रिल, २००५ मध्ये प्राप्त झाल्या, वास्तविक दोन्ही अपीलीय अधिकाऱ्यां कडून प्राप्त झालेल्या एकाच मुद्या बाबतच्या मुलाखत अहवालाच्या प्रतीमध्ये सारखेपणा असणे आवश्यक होते. याबाबत मा.सह.संचालक, मुंबई यांच्याकडे संस्थेनी माहिती सादर केली आहे. त्या संदर्भात मी माझा खुलासा

स्पीड पोस्टद्वारे कळविला आहे. या संदर्भात मला खालीलप्रमाणे अहवाल, अभिप्राय पाहिजे. i) सर्व पदाकरिता उमेदवारांच्या मुलाखती झाल्या सर्व पदाकरिता उमेदवार उपस्थित होते, परंतु संस्थेनी त्यापैकी लिपिक, शिक्षक (बी.एम.), निदेशक (बी.एम.), शिक्षक (एम.आर.इ.डी.ए.) शिक्षक (अॅग्रोकेमीकल) यांचीच नियुक्ती का केली ? बाकी पदाच्या नियुक्त्या का केल्या नाहीत ? याबाबतचा स्पष्ट अहवाल अभिप्राय देण्यात यावा. ii) अॅग्रोकेमीकल या विषयाच्या शिक्षक पदाकरिता मुलाखत अहवालाप्रमाणे इतर उमेदवार उपस्थित असतांनी, सायन्य विभागातील पुर्वनियुक्त कर्मचारी सौ. पी. एस. पिंपरकर यांची एम.सी.व्ही.सी. विभागामध्ये नियुक्ती दाखवून शासनाकडून मान्यता मिळवून पगार प्राप्त केला आहे याबाबत स्पष्ट अहवाल, अभिप्राय देण्यात यावा. iii) मुलाखत अहवालाच्या प्रती व त्याप्रमाणे नियुक्ती मान्यता प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रती यामध्ये पुष्कळ तफावत आहे. याबाबत संस्थेचा अभिप्राय अहवाल देण्यात यावा. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.१०.२००६ रोजी एकूण ९ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००६ रोजी अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष, विदर्भ ग्रामीण शिक्षण संस्था, अकोला यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.११.२००६ रोजी सुनावणी झाली व दिनांक ६.१२.२००६ ला निर्णय देण्यात आला असून सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी उपरोक्त ज्या मुद्यांवर माहिती मागितली त्या मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगास सांगितले, त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे वकीलांनी युक्तिवाद केला. युक्तिवादामध्ये त्यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुपा विषयी आयोगाचे निदर्शनास आणूण दिले की, सदरची माहिती जूनी १९९६ पूर्वीची आहे व व्यापक स्वरुपाची आहे. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांचा संबंध नाही अशा प्रकारची माहिती सुध्दा त्यांनी मागितलेली आहे. आता पर्यंत संपूर्ण विद्यालयाची माहिती मागितली असून कर्मचाऱ्यांची सुध्दा माहिती मागितली आहे. त्यातील काही माहिती आज सुध्दा उपलब्ध असू शकत नाही व त्याकरिता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. १) कनिष्ठ महाविद्यालयातील द्विलक्षीय

अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांचे पत्ते, हाजरी रजिस्टर व इतर संबंधित कागदपत्र मिळण्याबाबत. मागणी केली सदरहू कनिष्ठ महाविद्यालयातील द्विलक्षीय अभ्यासक्रमाला कोणतीही सरकारी अनुदान नाही. तसेच या अभ्यासक्रमाला १९९६ ते २००४ पर्यंत अंदाजे १२०० विद्यार्थी होते व त्यांचा रेकॉर्डवर कोणताही आक्षेप नाही. अशा परिस्थितीत इतका मोठा रेकॉर्ड जो अनुदानित नाही तो देता येत नाही. तसेच वरीलच्या काळामध्ये काही वर्ष श्री. खेडकर हे सेवारत होते व त्यांना याची सर्व माहिती आहे व या रेकॉर्डशी काही संबंध नाही तसेच विद्यार्थी रेकॉर्डच्या शिक्षकांचा काही संबंध येत नाही. २) संस्थेतील श्री. संजय पांडुरंग नागे (स.शि.) व श्री. एस. पी. जाधव यांच्या नियुक्तीबाबत संस्थेच्या ठरावाची झेरॉक्स व मस्टरवर रेकॉर्डवरचे नोंदची मागणी करण्यात आली. दोन्ही सहशिक्षक यांने एक दोन दिवसात कामे करुन आपला कार्यकाल पूर्ण केला नाही. तसेच त्यांना दुसरी नोकरी मिळाल्यामुळे ते परत आले नाही ते तसेच सेवामुक्त झाले. ३) संस्थेतील श्री. एन. बी. कुळकर्णी पत्र जावक क्र. ४१४४ किंवा जा.क्र. ४१४२, दिनांक १०.६.१९९९ रोजी सेवामुक्त केले त्या ठरावाची मागणी करण्यात आली. सदरहू कर्मचारी अजूनही कार्यरत आहे सेवामुक्त झाले नाही. ४) संस्थेचे श्री. जी. एस. कीरतकार (निदेशक) व श्री. व्हि. डी. घाटोळ (निदेशक) दिनांक ३०.४.२००१ रोजी सेवानिवृत्त केले होते. त्याचा ठरावाची कॉपी मागणी केले आहे सदरहू व्यक्ती आजही कार्यरत आहे. सेवामुक्त झाले नाही. ५) कार्तिक मनोहर देशमुख या विद्यार्थ्याला ११ वी पास झाल्यानंतर एम.सी.व्ही.सी. १२ वी मध्ये सरळ प्रवेश दिला त्या गुणपत्राची व टि.सी. झेरॉक्स मागण्यात आली. विद्यार्थीचा रेकॉर्डबद्यल शिक्षकाचा काही संबंध नाही. तसेच सक्षम अधिकाऱ्यांनी कोणताही आक्षेप घेतला नाही. ६) श्री. खेडकर यांना संस्थेत २००० मध्ये कायम केले त्या ठरावाची प्रत व दुसऱ्या वेतन वाढीची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आली. परंतु सेवेत कायम करण्यात आल्याचा आदेश प्राप्त झाला नाही. याबद्यल असे खुलासा आहे की, सदरहू व्यक्ती त्या पिरेडमध्ये कामावर होता व त्याकडे त्याची माहिती आहे. ७) दिनांक २.९.२००५ च्या पत्रातील सुट्टीचा खुलासाबद्यल खेडकरनी कळविले आहे. सुट्टीचा अर्ज देत असतांना त्याची ओसी त्यांच्याकडे असल्यामुळे त्याचा रेकॉर्ड उपलब्ध आहे. ८) मा. एस. आर. पाटील आपल्या संस्थेत कनिष्ठ महाविद्यालयात सन १९८६-८७ पासून प्रा. पदावर असून त्यांचा नियुक्तीस शासनाकडून मान्यता मिळाली त्याची मागणी करण्यात आली आहे. खुलासा नियुक्ती बद्यल विचारण्याचा अधिकार शासनाला आहे शिक्षकाला नाही. ९) दिनांक १६.११.२००५ पर्यंत एम.सी.व्ही.सी. या विभागामध्ये विद्युत पुरवठा नव्हता तरी सुध्दा अभ्यासक्रमाचे काम कसे चालले याबद्यल

माहिती मागितली होती. विद्युत पुरवठा नसतांना जनरेटरवर अभ्यासक्रमाचे काम चालत होते. त्याबद्यल कोणत्याही पालकाचे आक्षेप आले नाही. १०) दिनांक ३१.१२.१९९७ रोजी श्री. खेडकर यांना परिविक्षाधीन कालावधी करिता मला नियुक्ती आदेश दिलेला होता व पुन्हा दिनांक २२.६.१९९८ च्या रेकॉर्डला कसा आला. श्री. खेडकर हे शिक्षक म्हणून कार्यरत शिक्षण उपसंचालक, विभाग अमरावती यांचेकडून सत्र अखेरपर्यंत असल्यामुळे पुर्ननियुक्तीचा आदेश देण्यात आला. ११) मुद्या क्रमांक द या संबंधी मा. शिक्षण उपसंचालक, अमरावती, शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे मार्फत खोटे दस्तवेज तयार करण्याबाबत एम.सी.व्ही.सी. कर्मचाऱ्यांविरुध्द चौकशी सुरु म्हणून प्रकरण प्रलंबित. अधिक खुलासा. श्री. राजकुमार मोतीराम खेडकर हे शिक्षक म्हणून एम.सी.व्ही.सी. विभागात कार्यरत आहे व सध्या विद्यमान हायकोर्टच्या निर्णयामुळे त्यांना दिनांक ३१ डिसेंबर, २००७ पासून पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे. त्यांचा सेवेबद्यल पुरावे, कागदपत्र सर्व माहिती पीठासीन अधिकारी, अमरावती यांचेकडे चाललेली होती व वरील सर्व कागदपत्रांचे पुरावे व चर्चा सर्व पुरावे सोबत संपुष्टात आले आहे. म्हणून माहितीच्या अधिकार खाली जे अपील दाखल करण्यात आली आहे ते कागदपत्र फक्त त्रास देण्याचा उद्येशाने व कामामध्ये खोळंबला पाडण्याचे उद्येशाने गेल्या ४-५ वर्षापासून त्रास चालू आहे. कलम १९ प्रमाणे ३० दिवसाचा आत अपील करण्याचे प्रावधान आहे. सदरहू अपील विद्यमान राज्य माहिती आयोगाकडे तीन महिन्यानंतर करण्यात आली व विलंबाचे कोणतेही कारण दिले नाही व अपील लिमिटेशनच्या मुद्यांवर डिसमिस करण्यात यावा. श्री. खेडकर यांनी पूर्ण अपील मध्ये असे नमुद केले नाही हे कागदपत्र कशासाठी पाहिजे. वास्तविक कोर्टात केस दाखल करण्यासाठी कागदपत्र मागण्यात आले होते. परंतु पीठासीन अधिकारी, शालेय न्यायाधिकरण व पुरावे दाखल करुन संपुष्टात आली आहे म्हणून कागदपत्रांची काही आवश्यकता नाही. श्री. खेडकर यांनी सुरवातीच्या माहितीमध्येच १२०० विद्यार्थ्यांचा रेकॉर्ड मागितला आहे. ते अशावरुन दिसून येते ती केवळ माहितीचा अधिकाराचा दुरुपयोग व त्रास देण्याकरिता अपील दाखल करण्यात आली आहे. अपीलमध्ये कोणताही ठोस पुरावा दिला नाही. म्हणून अपील खारीज करण्यात यावी हि विनंती. ११ मुद्यांच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा केला. तसेच अधिकचा खुलाश्यामध्ये श्री. राजकुमार मोतीराम खेडकर हे शिक्षक म्हणून एम.सी.व्ही.सी. विभागात कार्यरत झाल्यानंतर विद्यमान हायकोर्टच्या निर्णयानुसार दिनांक ३१.१२.२००७ पासून पुन्हा त्यांना सेवेत घेण्यात आले याचा अर्थ अपीलकर्ता यांनी सेवेतून कमी केले होते व त्याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, महाविद्यालयाच्या

... ७

काही वर्गांना मान्यता मिळाली नव्हती त्या कारणास्तव शिक्षकांना कार्यालयाने कमी केले होते व त्यांना सुध्दा कमी करण्यात आले होते व त्यामुळे त्यांनी न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय देण्यात आलेला आहे. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीचे वेळेस अपीलकर्ता हे हजर होते. मात्र सुनावणी झाल्यानंतर सदरच्या कार्यवृत्तावर सही करण्यास नकार देण्यात आलेला आहे अशी नोंद घेण्यात आलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाश्यावरुन व त्यांनी युक्तीवाद केल्यावरुन सदरची माहिती ही जूनी व व्यापक स्वरुपाची आहे. अपीलकर्ता यांना माहिती मागण्याचा अधिकार आहे. माहिती मागतांना अर्जदारास कारण सुध्दा विचारता येत नाही तरी सुध्दा व्यापक प्रमाणात माहिती मागितल्यास सदरची माहिती ही अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगत असणे आवश्यक असते. अधिनियमाचा प्रमुख उद्येश हा व्यापक जनहिताकरिता माहिती मागणे असा आहे त्याबाबत अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरच्या संस्थेमध्ये भ्रष्टाचार असल्यामुळे सदरची माहिती मागितली आहे. परंतु तशा प्रकारे अपील, द्वितीय अपील अपीलकर्ता यांनी कोठेही म्हटले नाही. जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे तीन वर्षापासून माहिती मागत आहेत व त्या सर्व अर्जाचे संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तरीपण ते माहिती मागण्याच्या करिता अर्ज करीत असतात. वास्तविक अशा प्रकारची माहिती मागितली असेल तर अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे सदरची सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर यंत्रणा वापरावयाची असल्यास व व्यापक जनहिताची नसेल तर सदरची माहिती नाकारता येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व दाखल केलेला खुलासा व मा.उच्च न्यायालयाची प्रत ही अपीलकर्ता हे स्वहिताच्या दृष्टिने माहिती मागत आहेत असे दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी स्वत:ची माहिती सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येत नाही परंतु त्यांच्या अर्जातील मुद्यांचे अवलोकन केले असता त्यांनी स्वत:ची माहिती फार कमी मागितली आहे व इतरांची माहिती जास्त मागितली आहे व त्यामुळे त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.९.२००६ या अर्जात त्यांची स्वत: विषयी जी माहिती मागितली आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्याने छायांकित प्रतीच्या स्वरुपात त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. इतर माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

... ८

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.९.२००६ च्या अर्जामधील मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या स्वतः बद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यास हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४५/२००७.

श्री. हरीषचंद्र गुलाब उईके,
रा. बोथीया पालोरा, पो. पवनी (व्हाया कन्हान)
ता. रामटेक, जि. नागपूर - ४४१ ४०९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रशांत पागरुत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
(बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता,
(बांधकाम विभाग),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १७.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व त्यांच्या तर्फे श्री. लक्ष्मीकांत पाटोले हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचेवतीने श्री. नरेंद्र मेश्राम, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी उप कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. नागपूर-जबलपूर महामार्ग क्रमांक ७ ला जोडून असलेल्या ग्रामपंचायत पालोरा पर्यंत असलेल्या रस्त्याच्या खर्चा विषयीचा तपशील. १) जबलपूर

... २

महामार्ग ते बोथिया पालोरा गावा दरम्यान जाणाऱ्या किती कि.मी. रस्त्यासाठी निविदा काढण्यात व मंजूर करण्यात आल्या. २) निविदा १९९० ते २००६ पर्यंत कोणकोणत्या वर्षी काढण्यात आल्या व त्या कोणत्या कंत्राटदाराच्या नावाने मंजूर करण्यात आल्या, त्या कंत्राटदारांची नावे व ते काम पाहणाऱ्या अभियंत्याचे, कामाचे निरिक्षण व मंजूरी देणाऱ्या अभियंत्याचे, अधिकाऱ्याचे नांव, उल्लेखित रस्त्याचे नुतनीकरण कितीदा करण्यात आले आहे ? ३) १९९० ते २००६ दरम्यान जबलपूर महामार्ग ते बोथिया पालोरा रस्त्याचे नुतनीकरण, पॅचवर्क साठी आजतागायत मंजूर झालेल्या बिलाच्या छायांकित प्रती ज्यास मंजूर झाले त्या ठेकेदाराचे नांव, वर्षाच्या तत्संबंधी ऑडीट रिपोर्टची प्रत. ४) १९९० ते २००६ दरम्यान वर उल्लेखित रस्त्याच्या कामासाठी शासनाने किती रक्कम खर्ची घातली. नोव्हेंबर २००६ मध्ये मंजूर आणि निर्धारित काम पूर्ण झाले आहे काय ? ५) नोव्हेंबर २००६ मध्ये किती रकमेचे आणि किती कि.मी.चे काम ठेकेदारास देण्यात आले होते. माहितीचा कालवधी जानेवारी १९९० ते २००६ ऑक्टोंबर पर्यंत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच दारिद्र रेषे खालील आहे पुराव्याची प्रत संलग्न केलेली आहे असे सुध्दा नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.१.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक १६.३.२००७ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते व त्यापूर्वी दिनांक ९.२.२००७ रोजी कार्यकारी अभियंता तथा अपीलीय अधिकारी यांनी अर्जदारास सन १९९७-९८ चे सर्व्हेचे दारीद्र रेषे खालील असल्याचे वडीलांचे प्रमाणपत्राचे संदर्भात आक्षेप घेऊन सन २००६-०७ मधील दारिद्र रेषे खालील स्वतःचे नांव असलेले प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे असे कळविलेले दिसून येते व त्यावेळेस राज्य माहिती आयोगाच्या दिनांक १.४.२००८ च्या निर्णयाप्रमाणे दारिद्र रेषे खालील वडिलांचे प्रमाणपत्राचे संदर्भात व अर्जदाराचे स्वतःचे प्रमाणपत्राचे संदर्भात खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, रामटेक यांनी चौकशी करुन अहवाल देण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे चौकशी अहवाल व अभिप्राय खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, रामटेक यांनी सादर केलेला आहे. तो खालील प्रमाणे श्री. हरीचंद्र गुलाब उईके, रा. बोथिया पालोरा यांचे नाव दारिद्रय रेषे खालील कुटुंबाचे सर्व्हेक्षण यादीत समाविष्ट नाही. तसेच बयाणानुसार एकत्र कुटुंब असल्याचे श्री. हरिचंद्र उईके यांनी बयाण नोंदविलेले असले तरीही शासनाचे सन २००२-२००७ चे सर्व्हेक्षण यादीत त्यांचे वेगळे कुटुंब असल्याचे निदर्शनास येते. करिता अपीकर्ता श्री. हरीचंद्र

गुलाब उईके यांना वडीलांचे प्रमाणपत्रावर लाभ देता येणार नाही. करिता सेवेशी सादर असा अभिप्राय दिलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, दारिद्र रेषे खालील प्रमाणपत्रात आक्षेप हा प्रथम अपीलाचे नंतर घेण्यात आलेला आहे. माहितीच्या अधिकाराचा अर्जाचे संदर्भात तो घेतलेला नाही व माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे सदरची माहिती ही विनामुल्यच उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे माहिती ही साहित्याचे स्वरुपात उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, परिपत्रके यांच्या छायांकिंत प्रती उपलब्ध करुन देणे असा आहे. त्यामुळे ज्या प्रश्नामधून जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित आहे अशा प्रकारचे अभिप्राय देणे हे अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे नाही व ती देण्याची आवश्यकता नाही. मात्र कागदपत्राचे स्वरुपात जी माहिती उपलब्ध आहे त्याची छायांकिंत प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास त्याप्रमाणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य व्यक्तिशः हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी निर्णय मिळाल्यापासून तिसाव्या दिवशी माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घेण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १७.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६९१-६९३/१७.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९९१/२००७.**

श्री. संतोष लक्ष्मण लांडे,
रा. आझाद वार्ड,
पो. ता. चिमूर, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. जी. तेलकायल्लीवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर,
जि. चंद्रपूर.

श्री. भोयर,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत चिमूर.
जि. चिमूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक १७.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००६ रोजी ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिमूर यांचेकडे राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनाबाबत जमीन उपलब्ध नसल्यास, प्रथम जमीन उपलब्ध व्हावयास हवी की प्रथम घरकुल मंजूर व्हावयास हवे. घरकुल लाभार्थी म्हणून निवड केल्या जाऊ शकते काय. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन ग्राम सचिव यांनी दिनांक २६.७.२००६ रोजी अर्जदाराने मागितलेल्या माहिती बाबत संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर

... २

यांना मार्गदर्शन मागितलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते व त्यानुसार दिनांक २८.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेबाबत घरकुल मंजूरी करिता १) स्वतःच्या नावाने जागा असणे अनिवार्य, २) जमीन उपलब्ध नसल्यास घरकुल लाभार्थी म्हणून निवड करण्यात येऊ शकत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

२. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाचे संदर्भात दिनांक २६.९.२००६ रोजी केलेल्या पत्रव्यवहाराची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांनी ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत चिमूर यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे मार्गदर्शन केलेले दिसून येते व त्याबद्यलची प्रत सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. याचा अर्थ अपीलकर्ता यांनी यापूर्वी सुध्दा अशा प्रकारचा अर्ज प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा चंद्रपूर यांचेकडे केलेला दिसून येतो व त्यातूनच या योजने अंतर्गत प्रथम लाभार्थीची निवड करण्यात येऊन लाभार्थीची स्वतःची जागा नसल्यास शासनाच्या आदेशातील मुद्या क्रमांक १ नुसार मा.जिल्हाधिकारी जमीन विनामुल्य उपलब्ध करुन देऊ शकतात असे प्रथम अपीलात व द्वितीय अपीलात म्हटलेले दिसून येते व ही बाब दिनांक १०.९.२००८ रोजी ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत चिमूर यांनी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात म्हटल्याप्रमाणे देण्यात येते व त्यामुळे दिनांक २८.९.२००६ रोजी दिलेले उत्तर ही दिशाभूल करणारे दिसून येते. त्यामुळे संबंधित ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत, चिमूर यांची विभागीय चौकशी करणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तत्कालीन संबंधित ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, चिमूर यांनी अर्जदारास दिनांक २४.७.२००६ च्या अर्जास दिशाभूल करणारे उत्तर दिलेले असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

२) सदरच्या शिस्तभंगाची कारवाई ही संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर, जिल्हा चंद्रपूर यांनी करावयाची आहे.

३) अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.९.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/६९४-६९६/१७.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०५७/२००७.

श्री. नंदलाल केशरीप्रसाद शुक्ला,
५१, विद्यानगर,
ता. जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. आर. आर. कुंभारे, उपविभागीय अधिकारी, भंडारा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे माहिती मागितलेली होती. सदर अर्ज तहसीलदार, भंडारा यांच्याकडे १९ जून २००७ रोजी हस्तांतर करण्यात आला. अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून दिनांक ५.७.२००७ रोजी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय १८.७.२००७ रोजी दिलेला दिसून येतो. परंतु आज द्वितीय अपीलाचे सुनावणीचे वेळी अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १८०४/२००७ दिनांक २२.७.२००८ च्या आदेशाप्रमाणे माहिती प्राप्त झाली. आम्ही अत्यंत आभारी आहोत. आपले अपील क्रमांक२०५७/२००७ खारीज करावे असे अपीलकर्ता यांनी लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**भंडारा.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २३.९.२००८**
HIREKHAN/BHUJI/६७१-६७३/२३.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०००/२००७.

श्री. शंकर जर्नादन पेडलेवार,
मोहन नगर, टेन्ट लाईन,
प्रगती फिल्म जवळ,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. जी. गणविर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ,
बांधकाम संकुल, बंगला नं. ३९/१,
सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१.

श्री. देवेंद्र रामराव शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
विशेष प्रकल्प मंडळ,
बांधकाम संकुल, बंगला नं. ३९/१,
सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २४.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. (a) Decision (para wise) against representation dated ५.१.२००५ vide ex D/३९.

... २

(b) Original recorded entries in enquiry Rojnama proceeding bearing signature of delinguent, Defence Assistant, presenting officer, enquiry officer proving reexamination of delinguent Shri S. J. Paidlewar is recorded on २१.६.२००५ in enquiry as per the entry in order sheet dated १८.६.२००५ recorded by the eneuiry officer Shri N. A. Telang. (c) Copy of deposition recorded by Shri S. J. Paidlewar before enquiry on २१.६.२००५, with the help of defence Assistant. (d) Copy acknowledgement/Receipt of delinguent/defence Assistant proving supply of the copy of deposition of reexaminiation by the delinguent Shri S. J. Paidlewar. (e) Copy of notice of exparte proceeding started from २१.६.२००५ with acknowledgement receipt of delinguent of said notice issued under Rule ६.२८ of Enquiry Manuual १९९१. (f) Copy of Rojnama proceeding dated २१.६.२००५ proving issuing direction to the presenting officer Shri Shukla to file their final written brief on २२.६.२००५ with bearing signature on such Rojnama proceeding of the delinguent, defence Assistant, presenting officer and enquiry officer Shri N. A. Telang. (g) Copy of Rojnama proceeding of enquiry on २२.६.२००५, proving Shri Shukla presenting officer has been filed final written brief enquiry officer also proving signature on such Rojnama proceeding of delinguent/defence Assistant, presenting officer and enquiry officer. (h) Copy of receipt proving final written brief copy is supplied on २२.६.२००५ in the enquiry proceeding by the enquiry officer Shri N. A. Telang to the delinguent or defence Assistant bearing signature on Rojnama proceeding of all concerned. (i) Copy of Rojnama proceeding issuing directions on २२.६.२००५ or later on regarding filing of final written brief on behalf of delinguent and giving specific date in this regards. (j) Copy of final written brief or written notes of presenting officer submitted on २२.६.२००५ before

... ३

enquiry officer behind back of the delinguent. (k) Copy of postal Receipt/ acknowledgement, proving in exparte proceeding send the copy of written notes of presenting officer produced in enquiry on २२.६.२००५ in absence of delinguent. (l) Copy letters communications about proving support to adverse allegations recorded on page No २५ in last para against the delinguent as well as Defence Assistant. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.४.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ यांनी ४ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन देऊन प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३.५.२००७ रोजी त्यांनी माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा दिनांक ३.५.२००७ रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील सादर केलेला दिसून येतो. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये कक्ष अधिकारी यांनी दिनांक १६.५.२००७ रोजी अपीलाचे संदर्भातील अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, नागपूर हे आहेत. त्यामुळे आपला संदर्भीय अपील अर्ज अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ३.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी अधिक्षक अभियंता यांचेकडे निवेदन दिलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, यांनी दिनांक २७.६.२००७ रोजी सामान्य प्रशासन विभाग, मुंबई शासन परिपत्रक क्रमांक ममाअ/२००४/प्र.क्र. १८६/०४/०५, दिनांक २२.१२.२००४ प्रमाणे आपले विरुध्दचे विभागीय चौकशीचे प्रकरणात चौकशी अधिकाऱ्यांकडून सदर कागदपत्रे सरळ प्राप्त करुन घेण्याची संधी आपणांस उपलब्ध होती. तरीही आपण वेळोवेळी मागविलेली माहिती या अगोदर पुरविण्यांत आलेली आहे. तेंव्हा उक्त परिपत्रकान्वये माहितीचा अधिकार नियमाखाली सदर कागदपत्रे आपणास पुरविण्याची गरज नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००७ रोजी अपीलीय अधिकारी यांना निवेदन दिलेले दिसून येते व त्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलाचे सुनावणीचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी आयोगाकडे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व चौकशीच्या संदर्भातील कार्यवाही यांची सरमिसळ केलेली दिसून येते व चौकशीमध्ये काय त्रुटया आहेत त्याबद्यलची सुध्दा माहिती दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा.:- दस्तऐवज, अभिलेख, कागदपत्रे, टिप्पणी, परिपत्रके या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्याची छायांकिंत प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये केलेले विश्लेषण हे गैरलागू आहे. एकूणच जी माहिती मागितली दिसून येते ती माहिती अपीलकर्ता यांचे विरुध्द प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशीचे संदर्भातील दिसून येते. विभागीय चौकशीचा निर्णय झाला असल्यास त्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे अपीलकर्ता यांना उपलब्ध होऊ शकतात. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, विभागीय चौकशीचा अहवाल झालेला असून अंतीम निर्णयाकरिता शासनाकडे प्रलंबित आहे. याचा अर्थ विभागीय चौकशी पूर्ण झालेली नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम ८(१) (ज) प्रमाणे विभागीय चौकशी सुरु असण्याच्या कालावधीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याचा अपवाद करण्यात आला आहे व त्यामुळे आतापर्यंत जी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली आहे त्याकरिता प्रथम अपीलाचा जो निर्णय झालेला आहे तो योग्य आहे. अपीलकर्ता यांना त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीचा निर्णय गेल्यास त्यांना विभागीय चौकशीची संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन घेता येतील. आयोगाचे पुढे विभागीय चौकशीच्या ज्या त्रुटी आहेत त्या त्रुटी मांडून हा त्रुटया आयोगास देऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे व प्रथम अपीलाचा जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २४.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/६९८-७०१/२३.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २००१/२००७.

श्री. शंकरराव ओकटूजी मोटघरे,
दसरा रोड, काशीबाई देवळामागे,
महाल, नागपूर - ४४० ०३२. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर.

श्री. वामनराव खरात,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर,
नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.९.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २४.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी राज्य शासकीय माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मा. श्री. आर. आर. पाटील, उपमुख्यमंत्री/गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई हयांना आमच्या अपंग कल्याण कृती समिती मार्फत स्पिड पोष्टाने पाठविलेल्या पत्र क्र. एन/आर/अकाजी/ना/८/०४, दिनांक २८.१२.२००४, पत्र क्र. एम/आर/अकजी/ना/५४/०६, दिनांक २२.४.२००६, स्मरणपत्र क्र. एम आर अकजीना/६०/०५ स्पिड पोष्टाने

... २

दिनांक २५.७.२००६, स्मरणपत्र क्र. एम आर अकजीना/६९/०५, दिनांक २८.१०.२००६, स्मरणपत्र क्र. एम आर अकजीना/७३/०५, दिनांक २.१२.२००६ अन्वये श्री. आर. डी. लांजेवार, जेष्ठ नागरिक व घर मालक प्लॉट नं. ८५, सिध्दार्थ नगर, नागपूर हयांचे स्वत:चे मालकी हक्काचे तरी करण्यात गुंड व श्री. पी. एम. भालेराव व त्यांचे गुंड टोळीने बेकायदेशीर कब्जा करुन व विविध एन्टरप्रायझेस उघडून आणि निरनिराळे भाडेकरी ठेऊन पैसे वसूल करण्याचे कारस्थान सुरु केले आहे. स्वत:लाच घरमालक म्हणतो व घरावर "पुर्णाबाई निवास" बोर्ड लावून विजेची व पाण्याची चोरी करतो. त्यांचेवर व त्यांचे गुंड टोळीवर आतापर्यंत पोलीस स्टेशन, पाचपावली व मा.पोलीस आयुक्तांमार्फत केलेल्या कार्यवाहीसहित घेतलेल्या निर्णयाची सत्यप्रत आपण विभागवार शासकीय माहिती अधिकारी असल्यामुळे आमच्या संघटेस पुरविण्यात यावी. २) मा. श्री. ध. शिवानंदन, पोलीस आयुक्त, नागपूर हयांचे स्वाक्षरीचे कार्यालयीन पत्र क्रमांक पोआना/अर्ज शाखा/०४-४२८, दिनांक १०.१२.२००४ हे पत्र मा. उपमुख्यमंत्र्यांनी अर्जदाराच्या शेरांकित पत्रानुसार आपण विभागवार शासकीय माहिती अधिकारी असल्यामुळे आपण व पोलीस निरीक्षक, श्री.सुभाष मडावी, पाचपावली, पोलीस स्टेशन हयांना पाठविले असल्यामुळे पोलीस स्टेशन, पाचपावली हयांनी केलेल्या चौकशी अहवालासहित केलेली कार्यवाही व गैरअर्जदार श्री. भालेराव व त्यांची गुंडटोळी कडून सादर केलेले कागदपत्रांच्या मुळ सत्यप्रती तसेच सदरहु प्रकरणांवर आपणांमार्फत केलेली कार्यवाही व घेतलेला निर्णय हया सर्वांच्या सत्यप्रती पुरविण्यात याव्यात. ३) सदरहु पोलीस स्टेशन कडून प्राप्त अहवालावर मा. पोलीस आयुक्तांनी मा. गृहमंत्रालयामार्फत घेतलेल्या निर्णयाची व कार्यवाहीची साक्षाकिंत सत्यप्रत पुरवावी. तसेच सदरहु प्रकरणावर आजपावेतो माहिती पुरविण्यांत झालेल्या विलंबाचे कारण कृपया आमच्या संघटनेस कळवावे ही विनंती. सदरची माहिती नोंदणीकृत डाकेने मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.५.२००७ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी अपीलकर्ता यांना मुद्दा क्रमांक १ मा.उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील यांचेकडे वारंवार स्मरणपत्र पाठविल्याचे नमुद आहे. वर उल्लेखीत संदर्भाप्रमाणे आपले अर्ज चौकशी कामी प्राप्त झाले अथवा नाही हे समजून येत नाही. आपले अर्जामध्ये स्थानिक संर्भाचा उल्लेख नसल्यामुळे माहितीचा शोध घेणे व माहिती पुरविणे शक्य नाही. मुद्दा क्रमांक २ या मुद्दा संदर्भात पोलीस स्टेशन, पाचपावली येथे अर्ज रजिष्टर तपासले असता अर्ज प्राप्त झाल्याबाबत उल्लेख नाही असे पोलीस स्टेशन, पाचपावली यांनी कळविले आहे. मुद्दा क्रमांक ३ गृहमंत्रालयामार्फत घेतलेल्या निर्णयाची प्रत या

कार्यालयात उपलब्ध नाही. मुंबई पोलीस नियमावली भाग-२ नियम क्रमांक २६२ नुसार अर्ज चौकशी जतन करण्याचा कालावधी मुदत बाहय झाल्याने माहिती कळविणे शक्य नाही असे पोलीस स्टेशन, पाचपावली यांनी कळविले. असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००७ रोजी प्रथम अपील पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये आपण केलेला अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १२(१) नुसार केलेला आहे. कलम १२(१) केंद्रीय माहिती आयोग घटीत करण्याबाबतचे असून या कलमात अपील बाबत कोणतीही तरतूद नाही. असे पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. प्रथमतः सदरची माहिती मागण्याचा अर्ज हा समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती समिती, जिल्हा नागपूर श्री. शंकरराव ओकटूजी मोटघरे यांनी केलेला आहे. अधिनियमांचे कलम ३ प्रमाणे माहिती मागण्याचा अधिकार हा नागरीकांस आहे कोणत्याही संघटनेस नाही. तरीसुध्दा अर्जदाराचे अर्जात कार्यवाही पुढे केलेली असल्यास सुनावणी घेण्यात आलेली आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेला खुलासा खालील प्रमाणे आहे. उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये सादर आहे की, अपीलकर्ता श्री.शंकरराव ओकडूजी मोटघरे यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी माहिती मिळण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन) नागपूर यांचेकडे अर्ज सादर केला होता (सहपत्र पान क्र. १) सदर अर्जात अर्जदाराने मुद्या क्र. १ ते ३ नुसार माहितीची मागणी केली होती मागणी केलेली माहिती अर्जशाखा पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर, तसेच पोलीस स्टेशन, पाचपावली यांचे संबंधित असल्याने माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. पोआना/मा.अ./६५/२००७, दिनांक ५.४.२००७ नुसार माहिती सादर करण्यासाठी अर्जदाराचा अर्ज संबंधिताकडे पाठविण्यात आला. (सहपत्र पान क्र. २) प्रमुख लिपीक अर्जशाखा यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी पर्यंत माहिती सादर न केल्याने उलट टपाली माहिती सादर करण्यासाठी दिनांक २३.४.२००७ रोजी पत्र देण्यात आले. (सहपत्र पान क्र. ३) अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जशाखेकडे संबंधित असल्याने

अर्जशाखेतर्फे पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, पाचपावली यांना पत्र क्रमांक पोआना/अर्जशाखा/मोटघरे/ २५४/२००७, दिनांक १०.४.२००७, दिनांक १८.४.२००७ व दिनांक २४.४.२००७ चे पत्र देऊन माहिती सादर करण्याबाबत लेखी पत्र पाठवलेले आहे. (सहपत्र पान क्र. ४ ते ६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, पाचपावली यांनी त्यांचे पत्र क्र. १६५५, दिनांक २६.४.२००७ रोजी पोलीस आयुक्त यांचे नावे अर्जदाराने मागणी केलेल्या माहिती बाबतचे पत्र सादर केले. सदरचे पत्र आवक शाखेत दिनांक २६.४.२००७ रोजी प्राप्त झाले असून सदर अर्जासोबत इतर तीन सहपत्र संलग्न करण्यात आले आहे. (सहपत्र पान ७ ते १०) सदर वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अर्जदार यांना या कार्यालयाचे पत्र क्र. पोआना/माअ/६५/२००७, दिनांक ८.५.२००७ नुसार मुद्या क्र. १ ते ३ माहितीबाबतची माहिती बाबतचे पत्र पोलीस स्टेशन, कोतवाली मार्फत देण्यांत आलेले आहे (सहपत्र पान ११) अर्जदार यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी माहिती मिळण्याचा अर्ज सादर केलेला आहे. अर्जदाराने मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांचेकडून माहिती मागविण्यात आली व दिनांक ८.५.२००७ ला माहितीचे पत्र देण्यात आलेले आहे. अर्जदाराने सादर केलेल्या अर्जामध्ये नोंदणीकृत टपालाने माहिती मिळण्याबाबत नमूद केलेले आहे. परंतु त्यांनी कोणताही टपाल खर्च अग्रीम भरणा केला नसल्याने दिनांक ८.५.२००७ चे पत्रानुसार माहिती कळविण्यात आली आहे. माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज आल्यापासून ते त्या अर्जाचा निकाल लागे पर्यंत वेगवेगळे टप्पे पडतात. सहाय्यक माहिती अधिकाऱ्याने त्यांचेकडे दाखल केलेला अर्ज निकाली काढण्यासाठी ३५ दिवसाची मुदत आहे. अर्जदार यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी माहितीकरिता अर्ज दिलेला आहे. दिनांक ४.५.२००७ रोजी ३० दिवस पूर्ण होतात. पोलीस स्टेशन, पाचपावली यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार माहिती अधिकारी यांनी दिनांक ८.५.२००७ रोजी माहितीचे पत्र पाठविलेले आहे. दिनांक ९.५.२००७ रोजी ३५ दिवस पुर्ण होतात. माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक ८.५.२००७ रोजी म्हणजे ३४ व्या दिवशी माहितीचे पत्र पाठविलेले आहे. कलम ७ च्या पोटकलम १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उत्तर देण्याच्या कालावधीची परिगणना करतांना त्यात पाच दिवसाचा कालावधी मिळविण्यात येईल अशी तरतूद आहे. त्यामुळे अर्जदारास माहिती देण्यास कोणताही विलंब झालेला नाही. अर्जदाराने मागणी केल्यानुसार खालील प्रमाणे मुद्या क्रमांक १ ते ३ प्रमाणे कळविण्यात आले आहे. मुद्या क्रमांक १ मा.उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांचेकडे वारवांर स्मरणपत्र पाठविल्याचे नमूद आहे. वर उल्लेखित संदर्भाप्रमाणे आपले अर्ज चौकशी

... ५

कामी प्राप्त झाले अथवा नाही हे समजून येत नाही. आपले अर्जामध्ये स्थानिक संदर्भाचा उल्लेख नसल्यामुळे माहितीचा शोध घेणे व माहिती पुरविणे शक्य नाही. मुद्या क्र. २ या मुद्या संदर्भात पोलीस स्टेशन, पाचपावली येथे अर्ज रजिष्टर तपासले असता अर्ज प्राप्त झाल्याबाबत उल्लेख नाही असे पोलीस स्टेशन, पाचपावली यांनी कळविले. मुद्या क्र. ३ गृह मंत्रालयामार्फत घेतलेल्या निर्णयाची प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही. मुंबई पोलीस नियमावली भाग-२, नियम क्र. २६२, नुसार अर्ज चौकशी जतन करण्याचा कालावधी मुदत बाहय झाल्याने माहिती कळविणे शक्य नाही असे पोलीस स्टेशन, पाचपावली यांनी कळविले असे माहिती पत्राद्वारे देण्यात आली आहे. दिनांक ८.५.२००७ रोजी दुपार नंतर अपीलकर्ता श्री.शंकरराव ओकटूजी मोटघरे यांनी त्यांना ३० दिवसांचे आंत माहिती मिळाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १२(१) नुसार प्रथम अपील अर्ज सादर केला (सहपत्र पान क्र. १२ ते १३) अपील अर्जामध्ये त्यांना ३० दिवसांचे आंत माहिती दिली नाही म्हणून कलम २० नुसार शास्ती लावण्याबाबत नमूद केले आहे. कलम १२ हे केंद्रीय माहिती आयोग घटीत करण्याबाबतचे आहे. या कलमात अपीलाबाबत कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पत्र क्र. पोउपआ/मा.अ./अपील/६/२००७, दिनांक १५.५.२००७ नुसार अपीलकर्ता यांना लेखी कळविले आहे. (सहपत्र पान १४) यासोबत कागदपत्राची तारखेवार यादी माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ते मुदतीत माहिती देण्याचा अर्जदाराशी केलेल्या पत्रव्यवहाराचा प्रती, माहितीचा अर्जाची छायांकित प्रत , प्रथम अपील अर्जाची छायांकित प्रत त्यावर दिलेल्या पत्राची प्रत अनुक्रमणिकेनुसार यासोबत सादर आहे.

४. सकृतदर्शनी अपीलार्थीचे अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ज्या कार्यालयात माहिती अपेक्षित असते त्या कार्यालयात अर्ज दिलेला आहे किंवा तक्रार दिलेली आहे असा उल्लेख दिसून येत नाही. मात्र श्री. आर. डी. लांजेवार यांनी मा. आर. आर. पाटील, उपमुख्यमंत्री/गृहमंत्री यांचेकडे दिलेल्या अर्जाचा उल्लेख आहे. तसेच पोलीस आयुक्त, नागपूर श्री. ध. शिवानंदन यांनी श्री. सुभाष मडावी, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना दिनांक १०.१२.२००४ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत दिसून येते व त्यामुळेच सदरच्या अर्जाची नोंदणी त्या त्या कार्यालयात झाली नाही असे कळविलेले दिसून येते. अर्जासोबत दिनांक १०.१२.२००४ च्या प्रती दिल्या असल्या तरी तपास करुन माहिती उपलब्ध झाली असता दोन्ही प्रती ज्या

आयोगापुढे अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या आहेत. प्रतीत दिनांक ११.१२.२००४ ची पोच दिसून येते व पाचपावली अशा प्रकारचा अस्पष्ट स्टॅम्प दिसून येतो व त्यावरुन पुन्हा एक वेळ जनमाहिती अधिकारी यांनी तपास करुन पाहणी करुन सदरच्या अर्जाचे संर्भामध्ये झालेली कार्यवाहीची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून, जनमाहिती अधिकारी यांनी श्री.आर.डी.लांजेवार यांना मा. आर. आर. पाटील, उपमुख्यमंत्री/गृहमंत्री यांना दिनांक १२.१०.२००४ रोजी दिलेल्या अर्जावर दिनांक ११.१२.२००४ रोजी पाचपावली, पोलीस स्टेशनने स्विकारलेल्या अर्जाप्रमाणे झालेली कार्यवाही व मा.पोलीस आयुक्त, श्री. ध. शिवानंदन यांनी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री. सुभाष मडावी यांना दिनांक १०.१२.२००४ रोजी दिलेले अर्ध शासकीय पत्राचे अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २४.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/७०२-७०७/२४.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २००६/२००७.

श्री. एस. एफ. खोत,
प्लॉट नं. १०४, गायत्री अपार्टमेंट,
वैशाली नगर, कमाल टॉकीज रोड,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. चिलमुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (महसूल),
आयुक्त कार्यालय, नागपूर.

डॉ. सौ. सुजाता गंधे,
जनमाहिती अधिकारी तथा
चिटणीस,
आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.९.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा चिटणीस, आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्याकडे अव्वल कारकून संवर्गात मानीव दिनांक देऊन पुढील लाभ मिळण्याबाबत. माझा अर्ज दिनांक ३१.८.२००४ व दिनांक २५.११.२००४ वर केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण नस्ती टिप्पणीसह. माहिती व्यक्तिश: घेणार असे नमुद केलेले आहे व मोबाईल नंबर ९८५०३६२८६९ दिलेला आहे. सदरच्या अर्जाचे

...२

अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२००७ रोजी आपला दिनांक ३१.८.२००४ चा अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. आपल्या दिनांक २५.११.२००४ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची कार्यालयीन टिपणीची प्रत रुपये २८/- खजीना जमा करुन घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २१.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी रुपये २८/- चा भरणा केलेला दिसून येतो व त्याप्रमाणे त्यांना टिपणीची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व माहिती अप्राप्त असे त्यात नमुद केलेले दिसून येते. मात्र टिपणी देऊन माझी दिशाभूल केलेली आहे अशा प्रकारे प्रथम अपीलाचे कारण दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्ता यांना कळविलेला दिसून येतो व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. माहिती जरी उपलब्ध झाली असली तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या प्रमाणे मानीव दिनांक व पुढील लाभ मिळण्याची अपेक्षा दिसून येते. अर्थातच अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अर्ज केल्याचे वेळेस जी माहिती उपलब्ध असते ती उपलब्ध करुन दिली जाते. मात्र प्रलंबित प्रकरणामध्ये अंतीम निर्णयाची कार्यवाही होईलच असे नाही व त्याबाबत कारवाई करुन निर्णय देणे ही अपेक्षित पण नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २५.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/७०८-७०९/२५.९.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २००८/२००७.

श्री. रमेशकुमार मनोहरलाल बाली,
क्यू/२३५, फुटाना ओली,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
नगरपालिका प्रशासन,
आयुक्त कार्यालय, नागपूर.

श्री. प्रधान,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. एम. चौधरी, तहसीलदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक १३.७.१९९८ को जो दो टेंडर आये थे १) सोनु इलेक्ट्रीकल, नागपूर, २) रमेशकुमार बाली के नाम से आये थे. इसमे आपने सोनु इलेक्ट्रीकल से जो एक पाईप लिया तथा ४ क्लेम्प पट्टी लि तथा ६ बोल्ट लिये यही समान रमेश कुमार बाली से लेते तो वह समान कितने मे पढता इसकी संपूर्ण माहिती दि जाये. (जबकी १½ का ४ फुट का पाईप लगा, ४ पट्टी लगी,

... २

६ नटबोल्ट लगे) दोनो के रेट बताये जाये. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर यांच्याकडे दिनांक ८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १३.६.२००७ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपीलार्थीनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा अर्ज प्रतिवादी माहिती अधिकारी, नगरपरिषद, कामठी यांना उपलब्ध करुन देण्यांत यावा. सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आंत यांनी मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरविलेली नसल्यामुळे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना आदेशाप्रमाणे अर्जाची प्रत दिलेली नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. असा खुलासा करण्यात आलेला असून आयोगापुढे सुध्दा तोंडी सांगण्यात आले आहे. अपीलकर्ता यांनी त्यांनी मागितलेली माहिती आता मिळाली असे सांगितले. माहिती विलंबाने मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, दिनाक २.३.२००७ रोजी अर्ज त्यांनी मुख्य अधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे दिलेला आहे. त्यावर माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी अर्ज मिळत नाही अशा प्रकारे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते असे दिसून येते. परंतु त्यांनी नोटीस लेने से इंकार है असे लिहून दिलेले दिसते. यावरुन त्यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा तांत्रिक बाबींवर भर देणे महत्वाचे वाटते. आजही त्यांच्याकडे अर्ज माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिल्याचा कोणताही पूरावा नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांची कागदपत्रे दिल्ली येथे राहली असे असले तरी त्याच वेळेस त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी पुरावा आहे म्हणून माहिती द्यावयास पाहिजे होती. उलट त्यांनी दिनांक ८.६.२००७ रोजीचे पत्र घेण्यास नकार दिला. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आता माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २५.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/७१०-७११/२५.९.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०१३/२००७.**

श्री. मच्छिंद्र शंकरराव खोब्रागडे,
मु. पो. गिरगांव, ता. नागभिड,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. मधुसूदन गाडेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागभिड,
जि. चंद्रपूर.

श्री. वामन ना. डीडरे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्राम पंचायत कार्यालय, गिरगांव,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.९.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.९.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सरपंच तसेच ग्राम विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गिरगांव यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) आमचे घरगुती वापराचे नळाचे कनेक्शन कोणत्याही प्रकारचे पूर्व सुचना न देता व नोटिस रितसर न पाठविता कनेक्शन बंद कसे केले ? २) चार वर्षापासून कनेक्शन बंद केले असतांना आपण पाणीपट्टी कर कसे लावता व कोणत्या आधारे ? आमचे नळाचे कनेक्शन बंद केले असतांना आपण चार वर्षापासून पाणी पट्टी

... २

कराची मागणी करीत आहात ? आपणांस वारंवार सुचना देऊन सुध्दा कानाडोळा केला आणि आज पर्यंत पाणीपट्टी कर आकारणी चालू आहे. मला आपल्या कार्यालयास वारंवार सुचनापण देऊन कोणताही प्रतिसाद आपल्या कार्यालयामार्फत मिळाला नाही. करिता माहितीच्या अधिकाराद्वारे आपणास आम्ही रितसर उत्तर मागवित आहेत. तरी चार वर्षापासूनचे नळाचे कनेक्शन बंद असतांना आजपर्यंत लावलेला टॅक्स कपात करावा आणि उर्वरित टॅक्सची मागणी करावी मी रितसर टॅक्स भरण्यास तयार आहे व वरील प्रश्नाचे उत्तर येत्या ३० दिवसात देण्याची कृपा करावी. अन्यथा आपल्या ग्रामपंचायत कार्यालय गिरगांववर सरपंच व सचिवा विरोधात ग्राहक मंचाकडे तक्रार करावी लागेल. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ९.७.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीचे वेळेस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत कां उपलब्ध करुन दिली नाही असे विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जातील विचारलेले प्रश्न हे माहितीच्या अधिकारात येत नसल्यामुळे त्यांच्या प्रकरणाचे संदर्भामध्ये ग्रामपंचायतच्या सभेमध्ये सदरचा अर्ज प्रत्यक्ष ठेवून चर्चा करण्यात आली होती. सदरची सभा दिनांक २८.११.२००६ रोजी झाली. त्या चर्चेअंती थकित पाणीपट्टी २८६०/- रुपये भरणा करण्याचे कबुल केले होते व अर्जाचा निपटारा चर्चेमध्ये झाला होता त्यामुळे मी त्यांना लेखी कळविले नाही. त्याबद्यलच्या प्राश्र्वभूमीच्या संदर्भामध्ये ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत गिरगांव यांनी खालील प्रमाणे आयोगाकडे खुलासा केलेला आहे. वरील संदर्भीय पत्रान्वये व विषयान्वये विनंती आहे की, मी ग्रामपंचायत गिरगांव येथील प्रभार दिनांक ३१.५.२००४ रोजी घेतला. अपीलकर्ता श्री. मच्छिंद्र शंकरराव खोब्रागडे रा. गिरगांव व इतर ३ भाऊ यांनी दिनांक १२.२.२००६ ला घरगुती नळाचे कनेक्शन बंद करुन अनामत रक्कम परत मिळण्याबाबत अर्ज सादर केला. सदर नळ कनेक्शन हे यशोदाबाई शंकरराव खोब्रागडे यांचे नावे असून त्यांचेकडे विशेष पाणीपट्टीचे

२८६०/- रुपये थकित असल्यामुळे ती रक्कम भरणा केल्यानंतरच नळ कनेक्शन तोडण्यात येईल असे सांगण्यात आले. अपीलकर्त्यांने दिनांक २४.११.२००६ ला माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ४ वर्षापासून नळ कनेक्शन बंद कसे केले व पाणीपट्टी कर कसे लावण्यात आले याबाबत विचारणा केलेली आहे. मला ग्रामपंचायत गिरगांव येथे माहिती विचारलेल्या तारखेपर्यंत २ वर्ष ६ महिने झालेले आहेत. त्यामुळे अपीलकर्त्यांने केलेला आरोप चुकीचा आहे. तसेच अपीलकर्त्यांच्या अर्जावर ग्रामपंचायत गिरगांव येथील मासिक सभेत ठराव क्रमांक ३ दिनांक २८.११.२००६ नुसार प्रत्यक्ष त्यांना सभेत बोलावून चर्चा करण्यात आली होती व त्या चर्चेअंती थकीत पाणीपट्टी २८६०/- रुपये भरणा करण्याचे कबुल केले होते व अर्जाचा निपटारा चर्चेमध्ये झाला होता त्यामुळे मी त्यांना लेखी कळविले नाही. अपीलकर्ता व त्याचा मोठा भाऊ नामे श्री. पृथ्वीराज शंकरराव खोब्रागडे हे ग्रामपंचायत गिरगांवच्या मासिक सभेत दिनांक २४.२.२००७ ला प्रत्यक्ष आले व आम्ही २ दिवसात पाणीपट्टीची थकित रक्कम भरणा करतो असे चर्चेत सांगितले व त्यानुसार ठराव क्रमांक ६/७, दिनांक २४.२.२००७ ला मागील अर्जाप्रमाणे नळ कनेक्शन तोडण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला व त्याचा भाऊ नामे पृथ्वीराज शंकरराव खोब्रागडे यांनी दिनांक २६.२.२००७ ला त्याच्या आईच्या नावे असलेले थकीत विशेष पाणीपट्टीचे कर २८६०/- रुपये भरणा केले. अपीलकर्त्यांला सदर रक्कम भावांनी भरणा केल्याचे माहित झाल्यावर अपीलकर्ता नेहमी २८६०/- रुपये माझ्याकडे परत करा नाही परत केल्यास मी वार्ताहर असून पेपर मध्ये किंवा माहितीच्या अधिकाराखाली कोणतीही माहिती विचारुन आपणास बदनाम व त्रास देईन अशी तोंडी धमकी देत होता. परंतु मी त्यांचे बोलण्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे त्यांनी दिनांक १८.५.२००७ ला प्रथम अपीलीय अधिकारी मा.संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, नागभिड यांचेकडे अपील अर्ज सादर केला. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशान्वये वरील प्रमाणे माहिती पंचायत समिती, नागभिड कार्यालयात सादर करुन अपीलकर्त्यांला पंचायत समिती, नागभिड कार्यालयातून दिनांक १८.७.२००७ ला माहिती दिलेली आहे. वरील खुलाश्याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता नळ कनेक्शनच्या संदर्भामध्ये त्यांच्या केलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये पुढील सर्व कार्यवाही झालेली दिसून येते व पुन्हा त्याच बाबत त्यांनी माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितलेली दिसून येते. त्यातही प्रश्नाची उत्तरे द्या अन्यथा सरपंच व सचिवा विरोधात ग्राहक मंचाकडे तक्रार करावी लागेल असे माहितीच्या अर्जातच नमुद केलेले आहे व यावरुनच

अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील हेतु लक्षात येतो. त्या प्रतिज्ञा लेखात ज्या मुद्यांचे विश्लेषण केलेले आहे त्या मुद्यांच्या व दिनांक २४.११.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीचा संबंध नाही. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा दाखला सुध्दा त्यांनी जोडलेला दिसून येतो. ग्राम विकास अधिकारी यांनी सुध्दा खुलाश्यामधील मुद्यांप्रमाणे स्वयंस्पष्ट आहे अपीलकर्ता यांना या संपूर्ण प्रकरणातील माहितीच स्वतः माहिती आहे. तरी सुध्दा त्यांच्या सदरच्या प्रकरणात ग्राम पंचायत विरुध्द तक्रार असल्यास त्यांनी संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ प्रमाणे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. सदरच्या अपीलमध्ये अर्ज हा माहितीचा अधिकारानुसार नसला तरीही त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या स्वतःच्या व त्यांच्या कुटुंबाच्या दिनांक २४.११.२००६ च्या अर्जा वरुनच कार्यवाही झालेली असल्यामुळे त्यांना स्वतःच ती संपूर्ण माहिती असल्यामुळे व ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत सभेमध्ये दिनांक २८.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये निर्णय झाला असल्यामुळे व त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- ३०.९.२००८**

HIREKHAN/BHUJI/७१२-७१५/३०.९.२००८